## संपादकीय

### वाहून जाणाऱ्या पाण्याचे नियोजन हवे!

महाराष्ट्र राज्यात दिवसेंदिवस पाण्याची पातळी कमी होताना दिसते. त्यामुळे समाधानकारक पाऊस पडून सुद्धा राज्यातील नागरिकांना उन्हाळ्यात पाणीटंचाईला सामोरे जाण्याची वेळ येते. तेव्हा पावसाळ्यात पावसाचे पाणी अडवावे लागेल. त्याची साठवणूक करावी लागेल. महत्त्वाची बाब म्हणजे, अडविलेले पाणी दूषित होणार नाही याची काळजी घ्यावी लागेल. त्याचप्रमाणे झाडे सुद्धा लावली पाहिजेत. यामुळे साठविलेल्या पाण्याचे कमी बाष्पीभवन होण्याला मदत होईल.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### एसबीआयचा ग्राहकांना झटका, कर्जावरील व्याज दरात वाढ

मुंबई : स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कोट्यवधी ग्राहकांना सोमवारी झटका बसला. एसबीआयने कर्जावरील व्याजदरात वाढ केली आहे. स्टेट बँक ऑफ इंडियाने ठराविक कालावधीसाठी निधी-आधारित कर्ज दरा मध्ये १० बेस पॉइंट्स पर्यंत वाढ केली आहे. स्टेट बँक ऑफ इंडियाच्या वेबसाइटनुसार, कर्जावरील नवीन व्याजदर सोमवारपासून म्हणजेच १५ जुलैपासून लागू झाले आहेत. या वाढीमुळे गृहकर्ज, वाहन यांसारखी ग्राहक कर्जे महाग होणार आहेत. एसबीआयने एमसीएलआर वाढवण्याची ही दुसरी वेळ आहे. एसबीआयने ईबीएलआरमध्ये कोणताही बदल केलेला नाही. एमसीएलआर वाढल्याने सर्वसामान्यांच्या खिशावर परिणाम होणार आहे.


बीड – महाराष्ट्र वर्ष – ४ अंक–८६ मंगळवार दि.१६ जुलै २०२४ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 • पाने– ६ किंमत ३ रूपये


# पीक विमा भरण्यासाठी ३१ जुलैपर्यंत मुदवाढ



मुंबई । प्रतिनिधी

प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत एक रुपयात पीक विमा भरण्याची आज- दि. १५ जुलै ही अंतिम मुदत होती. मात्र राज्यातील अनेक शेतकरी अद्यापही काही कारणामुळे पिक विमा भरण्यापासून वंचित असल्याने त्यांना संधी मिळावी यासाठी पिक विमा भरण्यास मुदतवाढ मिळावी

## » कृषी मंत्री धनंजय मुंडे यांच्या प्रयत्नांना यश

अशी मागणी राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी केंद्र सरकारकडे केली होती. त्यांच्या मागणी नंतर ही मुदत ३१ जुलै पर्यंत वाढवण्यात आली.

सध्या राज्यात विविध योजनांसाठी लाभार्थींची कॉमन सर्विस सेंटर च्या केंद्रांवर गर्दी होत आहे.त्यामुळे शेतकऱ्यांना अर्ज व लागणारे कागदपत्रे जोडताना सर्व्हरची गती मंद झाली आहे. अद्याप ही अनेक शेतकरी पिक विमा योजनेपासून वंचित आहे त्यामुळे पिक विम्याचा अर्ज करण्यास मुदतवाढ मिळावी यासाठी राज्य शासनाच्या कृषी विभागाच्या वतीने पत्र व्यवहार करण्यात आला. तसेच असून मंत्री धनंजय मुंडे स्वतः याबाबत पाठपुरावा करत होते. त्यानुसार सोमवारी संध्याकाळी एक रुपयात पिक विमा भरण्याचे मुदत ३१ जुलै पर्यंत वाढवण्यात आली याबद्दल कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी ट्विट करून केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांचे आभार मानले आहेत.

# पायी वारी करणाऱ्या वारकऱ्यांना मिळणार पेन्शन

## राज्य सरकारकडून 'वारकरी महामंडळ'ची स्थापना

मुंबई । प्रतिनिधी

आषाढी एकादशी अवघ्या दोन दिवसांवर येऊन ठेपल्यामुळे राज्यात सर्वत्र भक्तीमय वातावरण झाले आहे. अशातच विठ्ठलाच्या नावाचा गजर करत पायी चालत जाणाऱ्या वारकऱ्यांसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एक मोठी घोषणा केली आहे. यंदाच्या अर्थसंकल्पात उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवार यांनी 'वारकरी



महामंडळ'ची स्थापना करणार असल्याची घोषणा केली होती. त्याअंतर्गत आता पायी जाणाऱ्या वारकऱ्यांसाठी पेन्शन योजना सुरु करणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले आहे.

### काय आहे वारकरी महामंडळाचे उद्दिष्ट?

महाराष्ट्रातील तमाम वारकऱ्यांसाठी स्वतंत्र वारकरी महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे. यामध्ये वारकऱ्यांच्या प्रश्नांचे निराकरण केले जाणार आहे. तसेच, वारकऱ्यांना पेन्शन लागू केले जाणार आहे. या महामंडळाच्या माध्यमातून पंढरपूरच्या विकासाला देखील गती येईल. प्रामुख्याने वारकरी संप्रदायाच्या अडीअडचणी प्रश्न सोडवणे, सर्व पालखी सोहळा मार्गाची सुधारणा करणे, वारकरी भजनी मंडळाला भजन व कीर्तन साहित्य करिता अनुदान देणे अशा अनेक मुद्द्यांच्या आधारे हे महामंडळ निर्माण करण्यात आले आहे. मुख्यमंत्र्यांकडून वारकरी महामंडळाच्या आदेशाची प्रत वारकऱ्यांना देण्यात आली आहे.

त्यामुळे वारकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

राज्य सरकार परंपरेने महिन्याची वारी करणाऱ्या वारकऱ्यांना वृद्धापकाळात वारकरी ◀◀ पान २ वर

# अंगणवाडी मदतनीसांची १४ हजार रिक्त पदे लवकरच भरणार

## महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांची माहिती

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यातील अंगणवाडी मदतनीसांची १४ हजार ६९० रिक्त पदे लवकरच भरण्यात येणार आहेत, अशी माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली.**

आदिती तटकरे म्हणाल्या की, एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत राज्यातील जिल्हा परिषद अंतर्गत ग्रामीण/आदिवासी प्रकल्पातील कार्यरत



अंगणवाडी केंद्रांमध्ये अंगणवाडी मदतनीसांची १३ हजार ९०७ रिक्त पदे आहेत. शहरी प्रकल्पातील कार्यरत अंगणवाडी केंद्रांमध्ये ७८३ अंगणवाडी मदतनीसांची रिक्त पदे आहेत. त्यानुसार ३१ ऑगस्ट २०२४ अखेरपर्यंत राज्यातील १४ हजार ६३९० मदतनीसांची रिक्त पदे भरण्यात यावीत, अशा सूचना सर्व जिल्हा व प्रकल्पस्तरावर देण्यात आल्या आहेत. याबाबतची जाहिरात लवकरच प्रसिद्ध होणार आहे. इच्छुक महिलांनी अर्ज सादर करावेत, ◀◀ पान २ वर

# पूजा खेडकर यांच्या अपंगत्वाबाबतही शंका

## आता पिंपरी चिंचवड कनेक्शन समोर

पुणे । प्रतिनिधी

आयएएस पूजा खेडकर प्रकरणात आणखी एक अपडेट समोर आली आहे. वादाच्या भोवऱ्यात अडकलेल्या आयएएस पूजा खेडकर यांचे पिंपरी चिंचवड कनेक्शन समोर आले आहे. येथील महापालिकेच्या वायसीएम



रुग्णालयातून देखील त्यांनी अपंगत्वाचे प्रमाणपत्र घेतल्याचे समोर आले आहे. डाव्या गुडघ्यात ७ टक्केवारीने त्या कायमस्वरूपी आधु असल्याचे या प्रमाणपत्रात नमूद करण्यात आले आहे. २४ ऑगस्ट २०२२ रोजी हे प्रमाणपत्र ◀◀ पान २ वर

### दोष सिद्ध होईपर्यंत मी निर्दोष –पूजा खेडकर

प्रशिक्षणार्थी आएएएस अधिकारी पूजा खेडकरने बोगस अपंग प्रमाणपत्रावरुन नोकरी मिळवण्याचे प्रकरण पुढे येत आहे. तसेच तिने ओबीसी आरक्षणाचा चुकीच्या पद्धतीने लाभ घेतल्याचाही संशय आहे. या प्रकरणी एक समिती नियुक्त करण्यात आलेली असून, समितीमार्फत पूजा खेडकरची चौकशी होणार आहे. पूजा खेडकरने सोमवारी माध्यमांशी संवाद साधून आपली भूमिका स्पष्ट केली. माझ्या प्रकरणात समिती गठीत केल्याने मी समितीलाच काय ते उत्तर देईल. आपल्या संविधानामध्ये जोपर्यंत एखाद्याचा दोष सिद्ध होत नाही तोपर्यंत त्याला आरोपी म्हणता येत नाही. माझ्या बाबतीत मीडिया ट्रायल सुरु असल्याचेही खेडकरने सांगितले. पूजा खेडकरच्या आई-वडिलांवर गुन्हा दाखल झाल्यानंतर ते फरार आहेत. याबद्दल तिला विचारले असता तिने, मला त्याबाबत काहीच माहिती नसल्याचे म्हटले.


# नको हार, नको सत्कार: धनंजय मुंडेंनी साधेपणाने केला शुभेच्छांचा स्विकार

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

राज्याचे कृषिमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना धनंजय मुंडे यांचा आज वाढदिवस आहे. त्यानिमित्ताने परळी मोठा भव्य दिव्य अभिष्टचिंतन सोहळा आयोजित करण्यात आला मात्र सकाळपासून दिवसभर धनंजय मुंडे यांनी हार तुरे, शाल, श्रीफळ असा कोणताही सत्कार स्वीकारला नाही. आपलं प्रेम आणि विश्वास हीच माझी ताकद असल्याचे सांगत कार्यकर्त्यांनी नागरिकांनी आणलेले पुष्पहार व पुष्पगुच्छ त्यांनी नाकारत उलट आलेल्या प्रत्येकाचा त्यांनीच सत्कार केल्याचे बघायला मिळाले. आजच्या वाढदिवसा दिवशी ही बाब लक्षवेधी ठरली.

ना. धनंजय मुंडे यांनी नको हार नको सत्कार अशा पद्धतीने साधेपणाने ◀◀ पान २ वर

## » कृषीमंत्रीपदाची वर्षपूर्ती आणि वाढदिवस : विलक्षण योगायोग







### कृषीमंत्रीपदाची वर्षपूर्ती आणि वाढदिवस : विलक्षण योगायोग

धनंजय मुंडे कृषी मंत्री झाले त्याला आज एक वर्ष झाले. मागील वर्षी आजच्या दिवशी त्यांनी वाढदिवस साजरा न करता कृषीमंत्री पदाची जबाबदारी मिळाल्यानंतर वाढदिवस बाजूला ठेवून खात्याचा आढावा घेतला होता.एक वर्षात त्यांनी इतके काम चांगले केले की दोनच दिवसापूर्वी त्यांना दिल्ली येथे सर्वोत्कृष्ट राज्य म्हणून महाराष्ट्राला पुरस्कार मिळाला.एका वर्षात धनंजय मुंडे यांनी महाराष्ट्राला सर्वोत्कृष्ट कृषी राज्य करून दाखवले. दरम्यान नेहमीच कर्तव्याला प्रथम प्राधान्य देण्याचा धनंजय मुंडेंचा प्रयत्न दिसुन येतो. या वाढदिवसाला हारतुरे टाळत निखळ प्रेम व आत्मियतेच्या शुभेच्छांचा स्विकार करत त्यांनी साधेपणा व एक वेगळेपण जपल्याचे दिसुन आले.

### वाढदिवसाच्या अभिष्टचिंतन कार्यक्रमातही पीकविम्यासाठी धडपड

विशेष म्हणजे आज एकीकडे धनंजय मुंडे यांच्या वाढदिवस अभिष्टचिंतन सोहळ्यासाठी जमलेली समर्थकांची अलोट गर्दी आणि त्यामध्ये धनंजय मुंडे यांचे प्रधानमंत्री पिक विमा योजना अंतर्गत पिक विमा भरण्यास मुदत वाढीसाठी प्रयत्न हे देखील लक्षवेधी ठरले. प्रधानमंत्री पिक विमा योजना अंतर्गत आज पिक विमा भरण्याचा अंतिम दिवस होता मात्र काही शेतकरी त्यापासून वंचित राहिल्यामुळे धनंजय मुंडे यांनी वाढदिवसाच्या गडबडीतही केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांच्याशी पत्रव्यवहार करून तसेच दूरध्वनीवरून संपर्क साधून पिक विमा भरण्यास आणखी पंधरा दिवसांची मुदतवाढ मिळवली आहे.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१३ जुलै २०२४**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| गहू : ६.५० क्विंटल | | |
| २,२९० | २,२९० | २,२९० |
| ज्वारी/हायब्रिड :७८.५० क्विंटल | | |
| २,००० | २,८३१ | २,४१४ |
| मूग : १.०० क्विंटल | | |
| १,९५० | ३,०४१ | २,४५५ |
| तूर : ०.५० क्विंटल | | |
| ८,८०१ | ८,८०१ | ८,८०१ |
| उडीद : १.५० क्विंटल | | |
| ७,०५१ | ७,०५१ | ७,०५१ |
| बाजरी: ८.५० क्विंटल | | |
| २,४८० | २,८०० | २,६४६ |
| चिंच/लोकल: २०.०० क्विंटल | | |
| १,१०० | ३,५५० | २,३२५ |
| सोयाबीन: १.५० क्विंटल | | |
| ४,३०० | ४,३०० | ४,३०० |
| हरभरा: ३.५० क्विंटल | | |
| ४,००० | ६,५०० | ५,७०० |

# लातूर नीट प्रकरणाचा म्होरक्या गंगाधर यास १९ तारखेपर्यंत न्यायालयीन कोठडी

लातूर । प्रतिनिधी

देशभरात नीट परीक्षेबाबत गदारोळ सुरू असताना नीट गैरवहाराप्रकरणी सीबीआय कोठडीत असलेला लातूर नीट प्रकरणाचा म्होरक्या आरोपी एन गंगाधर अप्पा यास ४ दिवसांची म्हणजेच १९ जुलैपर्यंतची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. याप्रकरणी अटकेत असलेल्या दोघांना आठवडाभरापूर्वीच न्यायालयीन कोठडी देण्यात आली होती.

नीट गैरव्यवहार प्रकरणातील आरोपी एन गंगाधर अप्पा यांची ◀◀ पान २ वर

# आषाढी एकादशीनिमित्त राजधानी दिल्लीत सांकेतिक वारी

नवी दिल्ली । वृतसंस्था

**आषाढी एकादशीचा उत्साह महाराष्ट्रात सर्वत्र शिगेला पोहोचल्याचे दिसत आहे. अशाच प्रकारचा उत्साह राजधानी दिल्लीतही आहे. आषाढी एकादशीच्या निमित्ताने राजधानी दिल्लीत बुधवारी (दि.१७) सांकेतिक वारीचे आयोजन करण्यात आले आहे.**

महाराष्ट्रात ज्याप्रमाणे आषाढी वारी असते, त्याचप्रमाणे दिल्लीत दिल्ली मराठी प्रतिष्ठान संस्थेच्या वतीने सांकेतिक वारीचे आयोजन दरवर्षी केले जाते. टाळ - मृदंगाचा गजर करत, फुगड्या घालत विठ्ठल रखुमाईच्या भक्तीचा गजर करत दरवर्षी दिल्लीकर मराठी बांधव या वारीचे आयोजन करत असतात. या वारीच्या निमित्ताने अनेक शतकांचा वैभवशाली इतिहास असलेल्या ◀◀ पान २ वर

# भीक नको, दुधाला हक्काचा ४० रूपये भाव द्या!

## आज इंदापूरमध्ये दूध परिषद, दूध उत्पादक शेतकरी समितीकडून संघर्ष सप्ताहला सुरूवात

पुणे । प्रतिनिधी

**दुधाला प्रति लिटर ४० रुपये भाव मिळावा, दूध प्रश्न कायमस्वरूपी सोडवण्यासाठी दुधाला एफ.आर.पी. व रेव्हेन्यू शेअरिंगचे धोरण लागू करावे, या मागणीसाठी दूध उत्पादक शेतकरी संघर्ष समितीने संघर्ष सप्ताहला सुरूवात केली आहे. याचदरम्यान मंगळवारी (दि.१६) गाईच्या दुधाला ४० रूपये हमीभाव मिळावा या मागणीसाठी दूध परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. इंदापूरमधील महापालिकेसमोर दुपारी १ वाजता दूध परिषद भरणार आहे.**



या दूध परिषदेला प्रमुख वक्ते म्हणून दूध उत्पादक शेतकरी संघर्ष समितीचे समन्वयक तथा अखिल भारतीय किसान सभेचे राष्ट्रीय सहसचिव डॉ. अजित नवले असतील. तर प्रमुख पाहुणे कुतवळ फुड्स प्रा.लिचे चेअरमन प्रकाश कुतवळ असणार आहेत. या परिषदेतून राज्य सरकारकडे शेतकऱ्यांच्या दुधाला चाळीस रूपये भाव मिळाला पाहिजे. मागील फेब्रुवारी, मार्च या दोन माहिने ◀◀ पान २ वर

### राज्यभर आंदोलनाला सुरूवात

दूध उत्पादक शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने राज्यभर आंदोलन सुरू करण्यात आले आहे. दुसऱ्या टप्प्यात कोतूळ येथे सोमवारी (दि.१५) सरकारचा निषेध नोंदवण्यात आला. दुधाच्या दरासह इतर मागण्यांवर सरकारचे लक्ष वेधण्यासाठी कोतुळ बाजारपेठ बंद ठेवण्यात आली. तसेच मध्यवर्ती चौकात बांधण्यात आलेली दूध हंडी शेतकरी कार्यकर्त्यांनी फोडत सरकारच्या निषेधार्थ प्रचंड घोषणा दिल्या.

## अग्रलेख

# वाहून जाणाऱ्या पाण्याचे नियोजन हवे !

महाराष्ट्र राज्यात दिवसेंदिवस पाण्याची पातळी कमी होताना दिसते. त्यामुळे समाधानकारक पाऊस पडून सुद्धा राज्यातील नागरिकांना उन्हाळ्यात पाणीटंचाईला सामोरे जाण्याची वेळ येते. तेव्हा पावसाळ्यात पावसाचे पाणी अडवावे लागेल. त्याची साठवणूक करावी लागेल. महत्त्वाची बाब म्हणजे, अडविलेले पाणी दूषित होणार नाही याची काळजी घ्यावी लागेल. त्याचप्रमाणे झाडे सुद्धा लावली पाहिजेत. यामुळे साठविलेल्या पाण्याचे कमी बाष्पीभवन होण्याला मदत होईल. अशा प्रकारे पावसाच्या पाण्याचे नियोजन केल्यास राज्यातील नागरिकांना उन्हाळ्यात पाणीटंचाईला सामोरे जाण्याची वेळ येणार नाही.

जून महिन्यात अधूनमधून पावसाचे आगमन झाले तरी जुलैच्या पहिल्या आठवड्यात मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. कोकण विभागाचा विचार करता कोकणात अनेक गावांचा संपर्क तुटला होता. जिकडे-तिकडे पाणीच पाणी दिसत होते. त्यामुळे उन्हाळ्यात पाणीटंचाई निर्माण झाली की पाण्याच्या नियोजनासाठी लोकप्रतिनिधी व प्रशासन विशेष बैठका आयोजित करीत असतात. तोपर्यंत पावसाचे आगमन होऊन नदी-नाले धोक्याच्या पातळीच्या वर तुडुंब भरून वाहत असतात. यामुळे अनेक वाड्यांतील घरे पाण्याखाली गेलेली पाहायला मिळाली. यात अनेक नागरिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तेव्हा उन्हाळ्यातील पाणीटंचाई टाळण्यासाठी पावसाच्या पाण्याचे योग्य नियोजन होणे आवश्यक आहे. केवळ कोकण नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्र राज्यात पावसाचे पाणी कसे साठवून ठेवता येईल त्याचे नियोजन होणे गरजेचे आहे. पावसाचे पाणी नदी-नाल्या वाटे समुद्राला जाऊन मिळते. तेव्हा वाहून जाणाऱ्या पाण्याची कशा प्रकारे साठवणूक करू शकतो याचा विचार होणे आवश्यक आहे. त्यासाठी पाऊस गेल्यावर उपलब्ध पाण्याचा वापर काळजीपूर्वक करावा लागेल.

राज्यात पावसाळ्यात पडणाऱ्या पावसाचा विचार करता पावसाचे पाणी अडविणे व जमिनीत जिरविणे अतिशय महत्त्वाचे असते. सध्या पाण्याची किंमत आपल्याला समजणार नाही. मात्र त्याच पाण्याच्या थेंबाची किंमत पाणीटंचाईच्या वेळी समजते. आपण सर्व काही करतो मात्र पावसाळ्यात पावसाच्या पाण्याचे नियोजन करत नाही. केवळ पाणी अडवा आणि पाणी जिरवा इतकाच नागरिकांना सबुरीचा संदेश देतो. मुख्य म्हणजे राज्यात ज्या भागात नागरिकांना उन्हाळ्यात टंचाईला सामोरे जायची वेळ येते त्या भागात खऱ्या अर्थाने पाणी जमिनीत जिरविण्यासाठी प्रयत्नशील असायला हवे. प्रत्येक बांधावर झाडे लावली पाहिजेत. पावसाळ्यात विहिरी खोदण्यापेक्षा उन्हाळ्यात विहिरींचे खोदकाम करावे. त्यासाठी जल तज्ज्ञांचे मार्गदर्शन घ्यावे. पावसाचे पाणी वाहून न घालविता ते अडवून जमिनीत कसे जिरविता येईल त्या दृष्टीने प्रयत्न करावे. पाणी दूषित होऊ नये म्हणून त्या विभागातील सांडपाण्याचे नियोजन करावे. जंगलामध्ये बंधारे बांधावे लागतील. ते सुद्धा बंधाऱ्याच्या पायथ्याशी लोकवस्ती असता कामा नये. कारण तिवरे धरणाचे काय झाले याची सर्वांना माहिती आहे. नंतर खेकड्यांना दोष देण्यापेक्षा खेकड्यांना चार हात दूर ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे असे बंधारे उन्हाळ्यात बांधावेत. त्याचप्रमाणे बंधाऱ्याच्या आसपास जर मोकळी जागा असेल, तर त्या जागेवर वन विभागाच्या वतीने वृक्षारोपण करावे.

बऱ्याच ठिकाणी बंधाऱ्याच्या आसपास झाडे नसल्यामुळे उन्हाळा सुरू होताच बंधारा कोरडा होतो. काही ठिकाणी दोन डोंगरांमध्ये बंधारा बांधला जातो. मात्र त्या पाण्याचा नागरिकांसाठी वापर करता आला पाहिजे. काही गावांमधील नद्यांवर कोल्हापूर टाईप (केटी) बंधारे बांधण्यात आलेले आहेत. मात्र त्यांना दरवाजे आहेत. पावसाळ्यात पाण्याची पातळी वाढण्याला सुरुवात झाली की बंधाऱ्याचे दरवाजे उघडले जातात. नंतर हिवाळ्यात पाणी कमी होऊ लागले की दरवाजे बंद केले जातात. त्यामुळे उन्हाळ्यात त्या गावाला पाण्याचा उपयोग होत असतो. पाण्यासाठी कोणतेही राजकारण करू नये. यासाठी शासकीय स्तरावर नि:पक्षपातीपणे शासनाला काम करावे लागेल. यात कोणत्याही प्रकारचा राजकीय हस्तक्षेप करता कामा नये. पावसाळ्यात प्रशासनाने पडणाऱ्या पावसाच्या पाणी अडविण्यासाठी पाण्याचे स्थानीक पातळीवर नियोजन करावे.

# हिंडेनबर्ग प्रकरणातील पुनर्विचार याचिका सुप्रीम कोर्टाने फेटाळली

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**अदानी-हिंडेनबर्ग प्रकरणात ३ जानेवारीच्या न्यायालयाच्या निर्णयाविरोधातील पुनर्विचार याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली. या याचिकेमध्ये हिंडेनबर्गच्या अहवालातील आरोपांची चौकशी एसआयटी किंवा सीबीआयकडे सोपवण्याची मागणी केली होती. यापूर्वी ३ जानेवारीच्या निर्णयामध्ये अदानी समूहाकडून शेअरच्या किंमतीत फेरफार केल्याच्या आरोपांचा तपास एसआयटी किंवा सीबीआयकडे सोपवण्यास न्यायालयाने नकार दिला होता.**



सर्वोच्च न्यायालयात सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड, न्यायमूर्ती जे. बी. पार्डीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या खंडपीठाने या प्रकरणी सुनावणी घेतली. पुनर्विचार याचिकेवर विचार केल्यानंतर आम्हाला आढळले की, रेकॉर्डमध्ये कोणतीही स्पष्ट त्रुटी नाही. सर्वोच्च न्यायालय नियम, २०१३ च्या आदेश एक्सएलव्हीआयआय नियम १ अंतर्गत पुनर्विचारासाठी कोणतेही प्रकरण तयार केले जात नाही. त्यामुळे पुनर्विचार याचिका फेटाळण्यात आली असल्याचे न्यायालयाने सांगितले.

# वारकऱ्यांच्या दिंडीत सहभागी होत सुरेश धस यांनी अनुभवला वारी सोहळा

**आष्टी । प्रतिनिधी**

पंढरीच्या दिशेने निघालेल्या लाखो वारकऱ्यांच्या दिंड्या,टाळ मृदुंगाच्या गजरात तल्लीन झालेले आणि विठुरायाची भेट घेण्यासाठी आसुसलेले मन आणि हाच अनुभव याची देही याची डोळा अनुभवन्यासाठी सोमवार दिनांक १५ जुलै रोजी सुरेश धस यांनी पंढरपूरच्या दिशेने निघालेल्या वारकऱ्यांची संवाद साधत पायी चालण्याचा वारी सोहळा अनुभवला. ज्ञानबा तुकाराम च्या जयघोषात निघालेल्या वारकऱ्यांसमवेत चालताना भक्ती रसात सुरेश धस देखील तल्लीन झाल्याचे यावेळी पाहायला मिळाले.याप्रसंगी सुरेश धस यांचे प्रत्येक दिंडीतील वारकऱ्यांनी उत्साहाने स्वागत केले. यावेळी अनेक दिंड्यांमध्ये सहभागी होत सुरेश धस यांनी वारीचा आनंद यावेळी श्री ह.भ.प. स्वामी जनार्दन महाराज मठाधिपती



श्री क्षेत्र संस्थान मत्सेंद्रनाथ गड निमगाव (मायंबा)ता.शिरुर कासार,श्री ह.भ.प.रामेश्वर महाराज शास्त्री श्री.क्षेत्र ब्रम्हनाथ येळब संस्थान ता.शिरुर कासार,श्री ह भ प उद्धव महाराज शास्त्री माऊली संस्थान नारायणवाडी,ता.शिरुर कासार, श्री.क्षेत्र कानिफनाथ संस्थान कान्होबाचीवाडी ता.शिरुर कासार,श्री. क्षेत्र रामगड संस्थान बीड,श्री. क्षेत्र नारायणगड (धाकटी पांढरी) ता.बीड श्री क्षेत्र अश्वथलिंग संस्थान पिंपळवंडी ता.पाटोदा यासह आदी दिंडीत सहभागी होत पायी वारीत चालत विठू नामाचा गजकेला.याप्रसंगी ह. भ. प.मधुकर महाराज शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या पालखी सोहळ्यास पंढरपूर येथील संस्थानच्या मठामध्ये वारकरी व महाराजांची भेट घेतली.तेव्हा संस्थांनच्या माध्यमातून सुरू असलेल्या विविध विकास कामे (महादेव मंदिर पिंड, छत्रपती शिवरायांचे स्मारक, महापुरुषांचे स्मारक(पुतळा),त्यासह विविध कामे दाखवत कामाची पाहणी केली.पाटोदा तालुक्यातील आठेगावपुठ्ठा परिसरातील वारकरी व ग्रामस्थ उपस्थित होते.तसेच श्री. क्षेत्र मच्छिंद्रनाथ गड सावरगाव ता.आष्टी येथील सालाबादप्रमाणे मच्छिंद्रनाथ गड ते पंढरपूर पालखी सोहळ्यास हजारोंच्या संख्येने भाविक येतात त्यांची भेट घेऊन संवाद साधला. आज पंढरपूर मध्ये होणार सुरेश धस यांच्या वतीने महापंगतीचे आयोजन. श्रीक्षेत्र गहिनीनाथ गड दिंडीतील वारकऱ्यांसाठी आज सुरेश धस यांच्या वतीने पंढरपूर येथे महापंगतीचे आयोजन करण्यात आले आहे.

# विविध मागण्यांसाठी वंचितचे जिल्हाधिकारी कार्यालयावर धरणे आंदोलन

**बीड । प्रतिनिधी**

**सम्यक विद्यार्थी आंदोलन बीड जिल्ह्याच्या वतीने आज जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे धरणे आंदोलन करण्यात आले. आंदोलनाचे नेतृत्व सम्यकचे राज्य प्रवक्ते प्रशांत बोराडे यांनी केले. उच्च शिक्षित तरुणांच्या रोजगाराची व्यवस्था करा अन्यथा त्यांना बेरोजगारी भत्ता तरी द्या. महागाई निर्देशांकानुसार शिष्यवृत्तीची रक्कम वाढवा.**

मागील शैक्षणिक वर्षातील प्रलंबित विद्यार्थ्यांची स्वाधार तात्काळ त्यांच्या खात्यात वर्ग करा. मुलींना मोफत शिक्षण या सरकारच्या घोषणेची तात्काळ अंमलबजावणी करा. इत्यादी विषयांवरती आज सम्यकने बीड जिल्हाधिकारी कार्यालय येथे धरणे आंदोलन केले. आज बीडमध्ये मोठ्या प्रमाणात पाऊस असल्याने व जिल्हाधिकारी कार्यालयात लेखनी बंद आंदोलन असल्याने सम्यकला आंदोलन आटोपते घ्यावे लागले. यावेळी ओबीसी नेते विष्णू दादा देवकते, सम्यकचे जिल्हाध्यक्ष रोहन मगर, प्रमोद निकाळजे, किरण वाघमारे, अजय सरवदे, लखन जोगदंड, सचिन मेघडंबर, मिलिंद सरपते, रोहन जोगदंड, रोहन लांडगे, कुणाल वारभुवन यांच्यासह अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# आषाढी एकादशी निमित्त बुधवारी ज्ञानयोग प्रतिष्ठानची बीड ते रामगड दिंडी

**बीड। प्रतिनिधी**

**गेल्या ६ वर्षांपासून आषाढी एकादशीचे औचित्य साधून प.पु.माऊलीजी यांच्या उपस्थितीमध्ये बीड ते रामगड पायी दिंडीचे आयोजन करण्यात येत आहे. यावर्षी सुद्धा मोठ्या उत्साहात दिंडी निघणार असून यावेळी ज्ञानयोग परिवारातील सर्व साधकांनी मोठ्या संख्येने यामध्ये सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले आहे.**



योग, प्राणायाम, आहार आणि हसतखेळत जीवनशैली या सुत्रांवर आधारलेल्या ज्ञानयोग प्रतिष्ठानची सध्या संपूर्ण महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेर ख्याती झाली आहे. देश आणि देशाच्या बाहेर सुध्दा आता माऊलीजींचे विचार पोहोचले असून छत्रपती संभाजी नगर येथील चैतन्य वनामध्ये दर महिन्याला होणार्या साधना शिबीर, ध्यान शिबीर, बाल शिबिर आणि शिक्षक प्रशिक्षक वर्गामध्ये सुध्दा मोठ्या संख्येने साधक सहभागी होतात. बीड जिल्हा आणि माऊलीजींचे अतुट असे नाते आहे. गेल्या ६ वर्षांपासून आषाढी एकादशी निमित्त बीड ते रामगड पायी दिंडीचे आयोजन केले जाते. या वर्षीसुध्दा ज्ञानयोग परिवार बीडच्या वतीने दिंडी सोहळा संपन्न होणार आहे. बुधवारी १७ जुलै २०२४ रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौक या ठिकाणाहून सकाळी ५.३० वाजता पायी दिंडीचे प्रस्थान होईल.यामध्ये स्वत: प.पु.माऊलीजी यांची प्रमुख उपस्थिती राहणार असून शिस्तबध्द पध्दतीने शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक, शाहूनगर, अंबिका चौक, वासनवाडी फाटा मार्गे दिंडी रामगडावर जाणार आहे. यामध्ये विठूनामाचा गजर, लेझीम, ढोल ताशा तसेच भगवी पताका खांद्यावर घेवून साधक सहभागी होतील. अंबिका चौक, वासनवाडी फाटा येथे रिंगण होऊन या ठिकाणी अल्पोपहाराचीही व्यवस्था तसेच पाण्याचीही व्यवस्था करण्यात आली आहे. रामगडावर दिंडी पोहोचल्यानंतर त्या ठिकाणी महंत स्वामी योगीराज महाराज आणि प.पु.माऊलीजी यांची भेट होणार असून भक्तीच्या या सोहळ्यात सर्वांनी मोठ्या संख्येने सामील व्हावे असे आवाहन बीड ज्ञानयोग परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

# कृषिशास्त्रज्ञ डॉ. एस.ए. पाटील यांचे हृदयविकाराने निधन

**बंगळूर । वृतसंस्था**

**प्रख्यात कृषिशास्त्रज्ञ आणि भारतीय कृषी संशोधन संस्थेचे (आयएआरआय) माजी संचालक डॉ. एस. ए. पाटील यांचे सोमवारी (दि.१५) वयाच्या ७८ व्या वर्षी निधन झाले. हाती आलेल्या माहितीनुसार, हृदयविकाराने त्यांचे निधन झाले. बंगळूर शहरातील भगवतीनगर हाऊस येथे त्यांचे पार्थिव ठेवण्यात आले होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, भाऊ असा परिवार आहे. त्यांची तिन्ही मुले अमेरिकेत असल्याने ती आल्यानंतरच अंत्यसंस्कार करण्याचा निर्णय डॉ. पाटील यांचे भाऊ आणि नातेवाईकांनी घेतला आहे.**



कृषी क्षेत्रातील उत्पादन वाढीसाठी त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. डॉ. पाटील यांनी कापूस, भुईमूग,कारळे, सूर्यफूल आणि एरंड या महत्त्वाच्या व्यावसायिक पिकांच्या १६ संकरित आणि उच्च उत्पन्न देणाऱ्या जाती विकसित केल्या. तसेच त्यांनी विकसित केलेले कापसाचे वरलक्ष्मी हे जगातील पहिले लांब धाग्याचे हायब्रीड वाण आहे. डॉ. पाटील धारवाड कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरु होते. इंडियन सोसायटी ऑफ ॲग्रिबिझनेस प्रोफेशनल्स (आयएसएपी) या संस्थेचे चेअरमन म्हणूनही त्यांनी काम पाहिले. डॉ. पाटील यांनी कृषी अध्यापन, संशोधन, विस्तार, विकास आणि प्रशासनाशी संबंधित ५० संस्थांमध्ये अध्यक्ष वा सदस्य म्हणूनही काम केले आहे. त्यांना आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्य आणि विद्यापीठ स्तरावर अनेक पुरस्कार मिळाले आहेत. त्यांनी कृषी क्षेत्रातील संशोधनात अनेक विद्यार्थी घडवले. तसेच २९९ विविध प्रकाशन त्यांच्या नावावर आहेत.

# वारकऱ्यांसोबत पायी दिंडीत रमले डॉ.योगेश क्षीरसागर

## जिल्ह्यामधून प्रस्थान केलेल्या दिंड्यांना दिल्या भेटी; वारकऱ्यांचे घेतले आशीर्वाद



**बीड । प्रतिनिधी**

**पाऊले चालती पंढरीची वाट.... म्हणत हजारो वारकऱ्यांनी पंढरपूरकडे प्रस्थान केले आहे. पंढरपूरनजीक असलेल्या बंडी शेगाव येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर हे सोमवारी (दि.१५) पायी दिंडी, पालखीत सहभागी झाले. त्यांनी बीड जिल्ह्यातून प्रस्थान केलेल्या अनेक दिंड्यांना भेटी दिल्या. टाळ मृदंगाच्या निनादात अन्? विठूरायच्या जयघोषात ते तल्लीन झाल्याचे पहायला मिळाले.**

डॉ.योगेश क्षीरसागर यांनी बीड तालुक्यातील नेकनूर येथील वै.श्रीगुरु बंकटस्वामी महाराज संस्थान नेकनूर, वानगाव येथील दिंडी क्र.६२, लिंबागणेश येथील बेलेश्वर संस्थान, गेवराई येथील दिंडीसह विविध दिंड्यांना भेटी दिल्या. यावेळी वै.श्रीगुरु बंकट स्वामी महाराज संस्थानचे मठाधिपती ह.भ.प.लक्ष्मण महाराज मेंगडे यांच्यासह विविध संस्थानचे मठाधिपती, महाराज, दिंडी प्रमुखांच्या भेटी घेऊन आशीर्वाद घेतले. तसेच, अखिल भारतीय वारकरी मंडळाचे बीड जिल्हाध्यक्ष ह.भ.प. हरिदास जोगदंड महाराज, ह.भ.प. नाना महाराज कदम आदींनी डॉ.योगेश क्षीरसागर यांचा सत्कार केला. खांद्यावर भगवी पताका घेऊन टाळ मृदंगाच्या निनादात अन्? विठुरायाच्या जयघोषात तल्लीन डॉ.योगेश क्षीरसागर हे तल्लीन झाल्याचे पहायला मिळाले.

### सकारात्मक ऊर्जा मिळाली : डॉ.योगेश क्षीरसागर

मी आज दिंडीत सहभागी होऊन बा पांडुरंगाच्या भक्तीत तल्लीन झालो. येथील भक्तिमय वातावरणातील ऊर्जा जीवनात सकारात्मकता निर्माण करते आणि सदकार्यासाठी बळ देईल. हा अनुभव सकारात्मक ऊर्जा प्रदान करणारा वाटतो, अशी प्रतिक्रिया डॉ. योगेश क्षीरसागर यांनी व्यक्त केली.

## पान १वरून...

### अंगणवाडी मदतनीसांची १४

असे आवाहन मंत्री तटकरे यांनी केले आहे. दरम्यान, अंगणवाडी मदतनीसांची रिक्त पदे भरण्याबाबत यापूर्वीही महिला व बाल विकास मंत्र्यांकडून घोषणा करण्यात आली होती. याशिवाय उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही अंगणवाडी महिलांच्या संघटनांनी पुकारलेल्या आंदोलनावेळीही यासंदर्भात आश्वासन दिले होते. मात्र त्यास जवळपास दोन वर्षे पूर्ण होत आली असून त्यावर अद्याप कोणतीच कारवाही झाली नाही. आता आदिती तटकरे यांनी पुन्हा एकदा अंगणवाडी मदतनीसांच्या रिक्त जागा भरणार असल्याची घोषणा केली आहे. सरकारचा कालावधी पूर्ण होण्यास आता दोन-तीन महिन्याचा कालवाधी शिल्लक राहिलेला असताना आता तरी या रिक्त जागा खरे्च भरणार का असा सवाल बेरोजगार महिलांकडून उपस्थित करण्यात येत आहे.

----------

### पायी वारी करणाऱ्या वारकऱ्यांना

पेन्शन लागू करणार आहे. या योजनेमुळे राज्यभरातील लाखो वारकऱ्यांना दिलासा मिळणार आहे. या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी मुख्यमंत्री वारकरी महामंडळच्यावतीने शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. वारकरी महामंडळाचे मुख्यालय हे पंढरपुरात असणार आहे. प्रशासकीय सेवेतील अधिकारी किंवा निवृत्त अधिकाऱ्यांची महामंडळावरती व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्ती केली जाणार आहे. महामंडळाचे भांडवल ५० कोटी इतके असणार आहे. तसेच, कीर्तनकारांना आरोग्य विमा कवचही दिले जाणार आहे.

------------

### पूजा खेडकर यांच्या

वायसीएम रुग्णालयाने पूजा खेडकरांना दिले आहे.. याआधी पूजा खेडकर यांना कमी दिसते, त्याअनुषंगाने त्यांनी अपंगत्वाचे प्रमाणपत्र मिळवल्याने त्या चर्चेत होत्या. अशातच आता डाव्या गुडघ्याच्या अपंगत्वाचे प्रमाणपत्र समोर आलेले आहे. त्यामुळे, पूजा खेडकर यांच्या अपंगत्वाबाबतही संशय आणि शंका वाढल्या आहेत. प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांचे एकानंतर अनेक कारनामे समोर येत आहेत. आपल्या खासगी कारवर अंबर दिवा लावून थाट आणि अधिकारी पदाचा रुबाब केल्यानंतर त्या चांगल्याच चर्चेत आल्या होत्या. मात्र, पूजा खेडकर यांच्या आयएएस अधिकारी पदाच्या निवडीवरच आता अनेक शंका उपस्थित होत आहेत. कारण, अंपगत्वाचे प्रमाणपत्र दाखवून त्यांनी ही सनदी अधिकारीपदाची नोकरी मिळवली, पण ज्या महाविद्यालयातून त्यांनी एमबीबीएसपदाची पदवी मिळवली, त्या महाविद्यालयाकडे आपण शारिरीकदृष्ट्या फीट असल्याचे प्रमाणपत्र त्यांनीच दिले असल्याचे उघडकीस आले आहे. त्यातच, आता पिंपरी चिंचवड महापालिकेतून त्यांना पायातील अपंगत्वाचेही प्रमाणपत्र देण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे, पूजा खेडकर यांचा पाय आणखी खोलात गेल्याचे दिसून येत आहे.

---------

### नको हार, नको सत्कार:

आपल्या वाढदिवसा दिवशी हजारो समर्थकांच्या शुभेच्छांचा साधेपणाने अतिशय आत्मियतेने स्वीकार केला. प्रत्येकाशी हस्तांदोलन, गळाभेट घेत आपले हे प्रेम व विश्वास हीच माझी ताकद आहे. हे कायम ठेवा अशा प्रकारचे आवाहन त्यांनी यावेळी केले. दरम्यान धनंजय मुंडे यांनी सकाळी वाढदिवसानिमित्त कुटुंबीयांसमवेत प्रभु वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाची पूजा व दर्शन घेतले. त्यानंतर परळीत आयोजित करण्यात आलेल्या अभिष्टचिंतन सोहळ्याला उपस्थित राहून त्यांनी आपल्या समर्थकांच्या शुभेच्छांचा स्वीकार केला. मात्र कोणाच्याही शाल, श्रीफळ, फेटा,पुष्पगुच्छ, हारतुरे आदी सोपस्कारांना फाटा देत जिव्हाळ्याचा अतिशय साधेपणाने त्यांनी शुभेच्छा स्वीकारल्या. वाढदिवसाच्या शुभेच्छा साधेपणाने स्वीकारणे हे मात्र आज लक्षवेधी ठरले. पंचम ज्योतिर्लिंग वैद्यनाथची पूजा व आरती केल्यानंतर वैद्यनाथाचा आशीर्वाद व प्रसाद म्हणून त्यांनी प्रभु वैद्यनाथाच्या हाराचा स्वीकार केला. त्यानंतर वाढदिवसानिमित्तचा कुठलाही हार ,पुष्पगुच्छ व सत्कार धनंजय मुंडे यांनी स्वीकारला नाही. अतिशय साधेपणाने त्यांनी सर्वांच्या केवळ शुभेच्छा स्वीकारल्या.

------------

### आषाढी एकादशीनिमित्त राजधानी

पंढरपूरच्या वारीचे दर्शन दिल्लीकरांना होते. दिल्लीतील कॅनॉट प्लेस परिसरातील हनुमान मंदिरापासून आर.के. पुरम परिसरातील श्री विठ्ठल मंदिरापर्यंत जवळपास १२ किलोमीटर वारीचा मार्ग असतो. दरवर्षी हजारो दिल्लीकर मराठी नागरिक यामध्ये सहभागी होत असतात. अधिकाधिक नागरिकांनी वारीत सहभागी होण्याचे आवाहन दिल्ली मराठी प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

------------

### लातूर नीट प्रकरणाचा म्होरक्या गंगाधर

सीबीआय कोठडी संपली होती. सोमवारी याबाबत सीबीआय पथकाने कोर्टात हजर केले असता त्यास ४ दिवसांची न्यायालयीन कोठडी कोर्टाने सुनावली आहे. देशभर गाजत असलेला नीट परीक्षेतील घोटाळ्याचे धागेदोरे महाराष्ट्रात निघाले असून नीट अभ्यासक्रमाचे मराठवाड्यातील केंद्र लातूर येथे चार जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला. यातील संजय जाधव आणि जलील पठाण यांना अटक करण्यात पोलिसांना यश आले होते. तर आरोपी इराण्णा कोनगुलवार फरार आहे. नीट पेपरफुटी प्रकरणी देशभर गदारोळ माजला असून या गैरव्यवहाराचे धागेदोरे महाराष्ट्रातील लातूर, धाराशिव जिल्ह्यांमध्येही सापडले आहेत. नीटमध्ये गुण वाढवून देण्यासाठी दिल्लीतील आरोपी एन गंगाधर अप्पा याच्याशी संपर्कात असाणारा उमरगा आयटीआरमधील नोकरी करणाऱ्या इरण्णा कोनगुलवार या आरोपीवर प्रशासनाने निलंबनाची कारवाई केली आहे. या प्रकरणात तो मध्यस्थाची भूमिका वठवत होता अशी माहिती देण्यात आली होती.

------------

### भीक नको, दुधाला हक्काचा

व इथून पुढील काळात मिळणाऱ्या दूध अनुदानाचा लाभ दूध उत्पादक शेतकऱ्यांना १०० टक्के मिळाला पाहिजे. सरकारने दूध पावडर व दुग्धजन्य पदार्थावरील जीएसटी कमी करावा. दूध पावडरला अनुदान देऊन पावडर निर्यात करावी. तर केंद्र सरकाने १० हजार टन पावडर आयात करण्याचा निर्णय त्वरित थांबवावा. यासह इतर मागण्या सरकारकडे करण्यात येणार आहेत. त्याच अनुषंगाने या परिषदेतून शेतकऱ्यांना जागरूक केले जाणार आहे. दूध दर प्रश्न कायमचा सोडविण्यासाठी इंदापूर दूध परिषदेत सखोल विचारमंथन केले जाईल. दुधाला एफ.आर.पी. व रेव्हेन्यू शेअरिंग मान्य करून घेण्यासाठीची लढाई यातून पुढे जाईल. त्यामुळे दूध उत्पादक शेतकऱ्यांनी परिषदेला उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.


### हरवले आहे.

स्नेहा महादेव मस्के या नावाचा ANM नर्सिंग चे अंतिम वर्षाचे मार्कशीट व इतर कागदपत्रे बीड ते पिंपळगाव मोची प्रवासादरम्यान हरवले आहेत. ज्या कोणास सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

:::संपर्क:::

मो.९५५२८५३४५३

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
मंगळवार दि. १६ जुलै २०२४


## आदित्य कृषी महाविद्यालयाच्या कृषिदूतांनी दिली औरंगापुर येथील शेतकऱ्यांना आधुनिक शीतगृहाबद्दल माहिती

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील आडगांव येथे वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठांतर्गत आदित्य शिक्षण संस्थेच्या जि. बीड येथील आदित्य कृषि महाविद्यालयातील चतुर्थ वर्षातील कृषिदूतांनी आधुनिक शीतगृहाबद्दल शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी कृषिदूत विशाल जंजाळ, बस्वलिंग स्वामी, विशाल गायकवाड, सतीश जंजाळ, प्रेमकुमार पडगण, रितेश वाडकर, प्रतिक शिंदे ,विद्यासागर पाटील यांनी ग्रामीण कृषी कार्यानुभव व कृषी औद्योगिक कार्यक्रम २०२३-२४ कार्यक्रमांतर्गत शून्य उर्जेवर आधारित शीत कक्ष बनवण्याची पद्धत व फायदे शेतकऱ्यांना सांगितले आणि शीत कक्ष का व कशासाठी बनवायचे याची देखील माहिती सांगितली. शीत कक्ष बांधायला सोपा व कमी खर्च असल्याने शेतकरी आपल्या शेतात ते बांधू शकतात व थोड्या दिवसांसाठी फळे भाजीपाला बाजारात विक्रीसाठी नेण्यापूर्वी त्यामध्ये साठवू शकतात. बाहेरील तापमानापेक्षा शीत कक्षामध्ये १० डिग्री सेल्सियस इतके कमी तापमान असते व ९५ डिग्री सेल्सियस आद्रता असते त्यामुळे उष्ण ऋतूत याचा उपयोग होतो. यासाठी कृषिदूतांना अभियांत्रिकी विभाग

# भाजपाला उशिरा सुचलेले शहाणपण

## पंकजाताईंच्या माध्यमातून जिल्ह्याच्या विकासाला लागणार हातभार

**नागनाथ वारद । अंबाजोगाई**

विधान परिषदेत विधान परिषदेच्या आमदार म्हणून बीड जिल्ह्याच्या माजीमंत्री आ. पंकजाताई मुंडे यांची वर्णी लागल्याने त्यांच्या आमदारकीचा फायदा जिल्ह्याच्या विकासासाठी होणार आहे.जिल्ह्यात पूर्वीचे सात आमदार व दोन खासदार आणि पंकजाताईंच्या माध्यमातून आठवा आमदार बीड जिल्ह्याला लाभला आहे. येणाऱ्या पंधरा दिवसात पंकजाताईंना राज्याचे मंत्रिपद मिळेल असा विश्वास मुंडे समर्थकांना वाटतो आहे. तर भारतीय जनता पक्षाने पंकजाताईंना दिलेली विधान परिषदेचे आमदारकी हे उशिरा सुचलेले शहाणपण असल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली आहे. बीड जिल्ह्याच्या विकासाला आता दहा लोकप्रतिनिधी मिळाले आहेत. बीड जिल्ह्याच्या विकासाला आता दहा लोकप्रतिनिधी लाभले आहेत.जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदारसंघाचे सहा आमदार,राज्यसभेच्या खासदार रजनीताई पाटील, बीड लोकसभेचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे,विधान परिषदेचे आ. सुरेश धस व आता पंकजाताईंना विधान परिषदेवर पाठवले आहे. पंकजाताई मुंडे हे जनसामान्यांचे नेतृत्व आहे. ओबीसी नेत्या म्हणून त्यांना मानणारा मोठा वर्ग आहे. शिवाय लोकनेते स्व.गोपीनाथराव मुंडे यांच्या त्या कन्या आहेत. नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत राज्यात भाजप महायुतीचा दारुण पराभव झाला.४५ पेक्षा अधिकचा



नारा देणाऱ्या भाजपाला नऊ पेक्षा पुढे जाता आलं नाही तर महायुती म्हणून केवळ १७ जागा जिंकल्या. राज्यातील राजकीय परिस्थिती हाताबाहेर गेली आहे. सत्ताधाऱ्यांबद्दल प्रचंड संताप व रोष आहे.नव्या महायुतीवर सामान्य मतदार नाराज आहे. भाजपचे खायचे दात एक आणि दाखवायचे दात एक असे त्यांचे धोरण आहे.म्हणून त्याचा मोठा फटका लोकसभा निवडणुकीत बसला तसेच ज्यांच्यावर आरोप आहेत त्यांनाच सोबत घेऊन ' क्लीन अँड क्लिअर ' केल्यामुळे सामान्य माणसाला ही बाब रुचलेली नाही.मराठा समाजात सत्ताधाऱ्यांबद्दल प्रचंड असंतोष आहे. त्याचाही फटका मोठ्या प्रमाणात बसला.मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनामुळे मराठा समाज, मुस्लिम समाज व बौद्ध समाज एकवटला आणि त्याचे रूपांतर प्रत्यक्ष मतदानात झाले.आता भाजपकडे ओबीसी शिवाय व्होट बँक नाही.गेली पाच वर्ष पंकजाताईंना पदापासून व सत्तेपासून दूर ठेवण्याचे पाप भाजप व देवेंद्र फडणवीस यांनी केले.लोकसभेत भाजप बॅकफुटवर गेल्याने आता विधानसभेला तरी मोठा फटका बसू नये म्हणून पंकजाताईंना विधान परिषदेवर घेण्यात आले आहे.त्यांना ही विधानपरिषद सहजासहजी दिलेली नाही. भाजपाची नौका डुबत असल्याचे लक्षात आल्यानंतर ' मासलीडर ' असलेल्या पंकजाताईंना सन्मान देण्यात आला आहे.जुनी भाजपा आजही अडगळीला पडली आहे. जुन्या भाजपातील माधव भंडारी, केशव उपाध्ये व इतर प्रवक्ते मंडळी आज कुठे आहे? याचा शोध घ्यावा.आता भाजपाने सुसंस्कृत प्रवक्ते ठेवले नाहीत तर संस्कृती सोडून अंगावर जाणारे प्रवक्ते ठेवले आहेत.राणे असोत,दरेकर असोत, राम कदम असोत की पडळकर इतर कोणी असो? हे भाजपात कधी आले त्यांचे पुनर्वसन किती लवकर झाले? हे पाहिले तर पंकजाताईंना खूप उशिरा न्याय मिळाला आहे. पंकजाताईंना सन्मान मिळाला ही अभिनंदन बाब आहे.पण भाजप अडचणीत असल्याने त्यांना वरील परिषदेवर घेण्यात आले.ज्यांनी भाजपच्या तोंडात भरपूर शेण घातलेले आहे 'हाफ चड्डीपर्यंतची ' त्यांची भाषा राहिलेली आहे.असे दल बदलू व प्रासंगिक करार ठेवणारे नेते भाजपसोबत राहिल्यास भाजपाचे पतन व्हायला वेळ लागणार नाही हेही तेवढेच खरे. पंकजाताईंच्या माध्यमातून बीड जिल्ह्याला विकासाची ही नवी संधी निर्माण झाली आहे. पंकजाताई सारखे अष्टपैलू नेतृत्व हे बीड जिल्ह्याच्या विकासासाठी सक्षम असे नेतृत्व आहे.त्यामुळे बीड जिल्ह्याच्या विकासात त्यांचा हातभार लागणार आहे.

## सामूहिक बलात्कारानंतर महिलेची हत्या करणाऱ्यांना फाशी द्या -नितीन सोनवणे

**पाटोदा । प्रतिनिधी**

शीळ गावातील घोळ गणपती मंदिर परिसरात एका ३० वर्षीय विवाहित महिलेवर तीन नराधमांनी सामूहिक बलात्कार करून तिचे डोके जमिनीवर आपटून निर्गुण हत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे या घटनेतील तीनही आरोपींना पोलिसांनी अटक केल्याची माहिती शीळ डायगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे त्या तीन नराधमांना पोलीस ठाण्यामध्ये आणून सखोल चौकशी केली असता मुंबईत राहणाऱ्या तीन नराधमांनी १)श्याम सुंदर शर्मा २)संतोष कुमार मिश्रा ३)राजकुमार पांडे या तिन्ही आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली आहे ऑल इंडिया पँथर सेनेची मागणी आहे हा खटला फास्टट्रॅक कोर्टात चालवावा त्या आरोपींना फाशीची शिक्षा द्यावी या खटल्यात महाराष्ट्रातील निष्णांत कायदेपंडित वकिलांची नेमणूक करावी पीडित कुटुंबांची मुख्यमंत्री गृहमंत्री कलेक्टर पोलीस आयुक्त महिला आयोग यांनी भेट देऊन मदत व सांत्वन करावे


पीडित कुटुंब हे अत्यंत दहशतीखाली आहे त्या पिढीत महिलेला चार वर्षाचे लहान मुल आहे त्यामुळे त्या लहान मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी महाराष्ट्र शासनाने घ्यावी पीडित मुलगा सज्ञान होताच त्याला सरकारी नोकरी देण्यात यावी अशी ऑल इंडिया पँथर सेनेची मागणी आहे अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल.

जुन्या चित्रपटात घरातून रुसून गेलेली महिला मंदिरात जायची परिवार सगळं शोधून झाल्यावर मंदिरात जायचे तिथे मंदिराच्या कॉलम ला पाठ देऊन बसलेली ती दिसायची. शेवटी तो चित्रपटच म्हणावं लागेल. वास्तव मात्र भयानक आहे.. नवी मुंबई बेलापूर भागातील आग्री समाजाची पीडित असून तिच्यावर झालेला अन्याय खूप मोठा आहे. धर्म आणि जात बघून आमच्याकडे मीडियात बातमी बनते. नेत्यांच्या विरोधासाठी सुद्धा जात धर्म खूप महत्वाचा आहे. सरकारला सुद्धा न्याय देण्यासाठी जात धर्म खूप महत्वाचा असतो. या आरोपीच्या जागी दलित किंवा मुस्लिम असता तर आता पर्यंत एन्काऊंटर झालं असतं.लव्ह जिहाद म्हणून बोंबलनारे ते टिल्लू पोरग कुठंय? ही बहीण वाटत नसेल त्याना? त्याला पाहिजे त्या जातींचे आरोपी भेटले नसावेत? ती बाई एक पत्रकार परिषद घेऊ शकत नाही कारण तिला आरोपीची जात महत्वाची वाटत असेल. काय राज्य आहे हे? किती भयंकर घटना आहे आणि चर्चा कुठेच नाही. यांना मंदिराचे अस्तित्व महत्वाचे वाटत असावे? या घटनेतील पीडितेच्या घरी कुणीच गेलं नाही पण न विसरता अंबानीच्या पोराच्या लग्नाला सगळे गेले, नाचत बसले यावरुन समजते ही किती असंवेदनशील व्यवस्था आहे. ऑल इंडिया पँथर सेना मागणी करत आहे त्या नराधम शर्मा, मिश्रा, पांडे या तिघांचे एन्काऊंटर करावे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदेनी महाराष्ट्रातून बुलडोझर घेऊन उत्तरप्रदेश मधील या हरामखोरांचे घर पाडावे. राज्यातील असुरक्षित मंदिराची यादी बनवावी. आश्रमात असलेल्या महिलाना सुरक्षा द्यावी. आरोपीला फाशीची शिक्षा झालीच पाहिजे. महिला आयोगाने रूपालीताई चाकणकर यांनी दखल घ्यावी. गृहमंत्री देवेन्द्र फडणवीस यांनी तात्काळ राजीनामा दिला पाहिजे. बलात्कार केलेले मंदिर सरकारने ताब्यात घेतले पाहिजे. सखोल चौकशी करून याआधी तिथे काय काय घडलं याची चौकशी केली पाहिजे. अशी ऑल इंडिया पँथर सेनेच्या वतीने जिल्हाधिकारी मार्फत मुख्यमंत्री गृहमंत्री यांना निवेदन देण्यात आले. उपस्थित नितीन सोनवणे जिल्हाध्यक्ष ऑल इंडिया पँथर सेना बीड, वसीम भाई शेख जिल्हा सचिव, रवी कसबे सदस्य, जावेद शेख सदस्य इत्यादी कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

## कार्यकारी अभियंता जायकवाडी पाटबंधारे विभागाला तक्रार देऊनही कारवाई नाही -भाऊसाहेब कांबळे

**बीड । प्रतिनिधी**

तालुक्यातील मौजे लिंबारुई देवी येथील मी भाऊसाहेब नागोराव कांबळे येथील रहिवासी असून मनकर्णिका साठवन तलावच्या बुडीत क्षेत्र काही लोकांची जमीन तलावात गेली नसताना सुद्धा तलावाच्या काही भागांमध्ये अतिक्रमणे करून धाबे, हॉटेल, घरे,बांधकाम करून बोर घेतले आहेत. याची ग्रामपंचायत कार्यालय व ग्रामसेवक यांची रीतसर परवानगी न घेता. तर पोलिसांच्या नाकावर टिचून काहींनी अवैधरित्या दारू विक्रीचे दुकाने टाकले आहेत तर काही लोकांनी त्यांची जमीन या धरणात गेलेली नसताना सुद्धा तलावाच्या भिंतीजवळ भर टाकून उंच ओठा करून जमिनी कसत असल्यामुळे भिंतीची उंची कमी होऊन भविष्यात तलाव फुटण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.त्यामुळे धरणाच्या भिंतीस हानी पोहोचून तलावात जास्त प्रमाणात पाणी आल्यास तलाव फुटून जीवित व वित्त हानी होऊ



शकते. तलाव फुटून वरील घटना घडून आल्यास याची सर्वस्व जबाबदारी या प्रकल्पातील अतिक्रमण करणारे लोक आणि सबंधित प्रकल्पाचे अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय बीड व तहसील कार्यालय बीड व कार्यकारी अभियंता जायकवाडी पाटबंधारे विभाग क्रमांक ३ यांची जबाबदारी राहील. या तक्रारीचा मा. जिल्हाधिकारी साहेबांनी सहानुभूती पूर्वक विचार करून आठ दिवसाच्या आत मनकर्णिका प्रकल्पातील अतिक्रमण करणाऱ्या लोकांवर कारवाई करून अतिक्रमण हटविण्यात यावे ही नम्र विनंती. जर शासनाने मनकर्णिक प्रकल्पातील अतिक्रमण धारकावर कारवाई करून अतिक्रमण ८ दिवसात न हटविल्यास मी भाऊसाहेब नागोराव कांबळे स्वतःहा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अमरन उपोषण बसणार आहे याची शासनाने दक्षता घ्यावी.

## पान ६ वरून...

### दिंद्रुड येथे सर्वांगसुंदर

गणरायाच्या मनमोहक मूर्तीची पारंपारिक वाद्यांच्या गजरात गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. सदरील शोभायात्रेत श्रीसंत ज्ञानोबाराय वारकरी शिक्षण संस्थेचे विद्यार्थी व महिला पारंपारिक वेशभूषेत सहभागी झाले होते. हरी ओम नमः शिवाय आणि गणपती बाप्पा मोरया च्या जयघोषात व टाळ मृदंगाच्या निनादात निघालेली मिरवणूक लक्षवेधी ठरली. यावेळी गणेश भक्तांनी पखवाजावर ताल धरत फुगड्यांचा आनंद घेतला. खोलेश्वर मंदिरापासून निघालेल्या शोभायात्रेचा समारोप ओम साईशिल्प या निवासस्थानी करण्यात आला. यावेळी ह भ प वैजनाथ महाराज काशीद, ह भ प सुशेन महाराज काशीद, शि भ प सूर्यकांत आप्पा काटकर आदी संप्रदायातील मंडळीसह पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शुभन महागणपतीची प्रतिष्ठापना करण्यासाठी बीड येथील ओंकार स्वामी व त्यांचे सहकारी उपस्थित होते. कोल्हापूर येथील श्रीक्षेत्र कनेरी मठाचे प. पू. श्री अदृश्य काडसिध्देश्वर स्वामीजी यांचे यावेळी प्रवचन झाले. स्वामीजींनी आपल्या प्रवचनात भक्तीच्या विविध मार्गांचा उल्लेख करत सर्वांनी धर्माचे आचरण करण्याचा संदेश दिला. शेटे परिवार हा धार्मिक व लोकोपयोगी कार्यक्रमात नेहमीच योगदान देत असल्याचे ते म्हणाले. कोणत्याही मंदिराची उभारणी हे परम भाग्याचे काम असून अनेक पिढ्यानंतर पुण्यवान लोकांच्या हस्तेच मंदिराची उभारणी होत असल्याचे स्वामीजींनी आवर्जून सांगितले.

### तट बोरगाव येथे राष्ट्रीय

कार्यक्रमामध्ये वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे कृषी विद्यावेत्ता डॉ वसंत सूर्यवंशी यांनी खरीप हंगामातील सोयाबीन व इतर पिकांचे कीड रोग अन्नद्रव्य व्यवस्थापन संदर्भात विस्तृतपणे मार्गदर्शन केले. सोयाबीन पिकातील पिवळसरपणा व्यवस्थापन, खोडमाशी व्यवस्थापन संदर्भात विस्तृतपणे माहिती दिली. तालुका कृषी अधिकारी विजयकुमार पवार यांनी रुंद वरंबा सरी पद्धतीने पेरणी केल्यामुळे झालेले फायदे समजावून सांगितले. कृषी पर्यवेक्षक माचवे यांनी कृषी विभागाच्या विविध योजना संदर्भात विस्तृतपणे मार्गदर्शन केले. कृषी सहायक पंडित काकडे यांनी फवारणी करतांना घ्यावयाची काळजी बाबत मार्गदर्शन करून प्रशिक्षण दाखवले. यावेळी गावातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### वीज वितरण व पाट

माळ तांडा येथील वीज पुरवठा सुरळीत करावा. अन्यथा दि.२६/७/२०२४ रोजी उप उभियंता महा वितरण उप विभाग धारूर कार्यालयासमोर महीला मुलांसह बंजारा समाज बांधव मोठया संख्येने बंजारा भजन आंदोलन करू असा निवेदनाव्दारे ईशारा प्रा.ईश्वर मुंडे राज्य प्रमुख, सेवा निवृत्त अधिकारी कर्मचारी सेल,राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष यांनी दिला आहे. निवेदन देते वेळी बंडू पवार,गौतम पवार,प्रकाश पवार,परमेश्वर पवार व बाळू पवार हे उपस्थित होते.

### उन्हाळ्यात पैसे उचललेल्या

विकास कामे आमच्या दट्ट्यामुळे चालू झाली आहेत. त्यामुळे ती चांगल्या दर्जाची व्हावीत. यासाठी तरी जनतेने लक्ष घालावे. जोपर्यंत गावातली जनता जागी होत नाही, तोपर्यंत ही कामे अशीच होतील. त्यामुळे जनतेतील नागरिक बोलत नसल्यामुळे आता त्या गावातील सुज्ञ महिलांनी या कामाकडे लक्ष घालावे, असे आवाहन देखील जन आंदोलनातर्फे महिला - भगिनींना करण्यात येत असल्याचे ॲड. देशमुख यांनी म्हटले आहे.

### बीड जिल्ह्यात ३ महसूल मंडळात

पावसाच्या सरासरीच्या तुलनेत आजपर्यंत २९५ मिलिमीटर (५२.१) टक्के पाऊस झाला आहे.

या ३ मंडळात झाली अतिवृष्टी

बीड तालुक्यातील नवगण राजुरी मंडळामध्ये ८२.८ मिलिमीटर तसेच पिंपळनेर मंडळात ९४.८ मिलिमीटर पाऊस झाला आहे. या पावसामुळे खरिपाच्या पीक वाढीसाठीला मदत होणार आहे. वडवणी तालुक्यातील कवडगाव मंडळातही अतिवृष्टीची (६९.८ मिलिमीटर) नोंद झाली आहे.

### वषारी औषध पाजून

करण्यात आला आहे. तर इकडे सासू कुंता कोकाटे यांचा संशयास्पद मृत्यू झाल्याने गेवराईचे पोलीस उपअधीक्षक नीरज राजपूत यांनी यांनी घटनास्थळाला भेट देऊन तपासाची चक्र हलवली आहेत. यावेळी चकलांबा पोलीस स्टेशनचे सपोनी. नारायण एकसिंगे यांच्यासह मोठ्या प्रमाणात पोलीस फौंज फाटा घटनास्थळी दाखल झाला होता. सासू कुंती कोकाटे यांच्या मृतदेहाचे रात्री उशिरापर्यंत शव विच्छेदन न झाल्यामुळे सायंकाळी आठ वाजेपर्यंत अंत्यविधीही झाला नव्हता.

## बीड जिल्हा खो-खो पंच परीक्षासाठी परीक्षार्थींचा प्रतिसाद

### खेळामध्ये पंचांचा निर्णय अंतिम राहील - जे.पी. शेळके

**बीड । प्रतिनिधी**

बीड येथील उमा किरण शैक्षणिक संकुल येथे खोखो ची पंच परीक्षा संपन्न झाली यावेळी नवीन परीक्षार्थींना जे. पी. शेळके सर राज्य कार्यकरिणी सदस्य यांचे प्रमुख उपस्थिती होती. तसेच यावेळी मार्गदर्शन करताना परीक्षार्थींना बोलताना खेळामध्ये एकदा निर्णय दिल्यास तो परत घेता येत नाही. पंचांचा निर्णय अंतिम राहील. तसेच प्रत्येक व्यक्तीने आपली शरीर संपत्ती जपायला पाहिजे. खेळामुळे शरीर सुदृढ राहते. आणि आजाराला बळी पडत नाही असे बोलताना शेळके सर म्हणाले. यावेळी पंच परीक्षा साठी जिल्हाभरातून



परीक्षार्थी उपस्थित होते. या परीक्षा प्रसंगी जी पी शेळके सर राज्य कार्यकारिणी सदस्य, बीड जिल्हाध्यक्ष ऋषिकेश शेळके साहेब, जिल्हा सरचिटणीस विजय जाहेर सर, जिल्हा कोषाध्यक्ष योगेश सोळशे सर, बीड जिल्हा उपाध्यक्ष रमेश शिंदे सर, मनोज जोगदंड साहेब, जिल्हा कार्यकारिणी सदस्य येळवे सर,राष्ट्रीय प्रशिक्षक प्रफुल्ल हाटवटे सर, गेवराई तालुका क्रिडा समन्वयक - तारूकर सर, सुधिर हजारे, माधव जायगुडे , तुकाराम करांडे यांच्यासह उपस्थीत सर्व टीम, सर्व जिल्हा पंच परिक्षार्थी उपस्थित होते.

## 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेचा ऑनलाईन फॉर्म भरा..! २१ ते ६५ वयोगातील पात्र महिलांनी लाभ घ्यावा -राजेंद्र मस्के

**बीड । प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या संकल्पनेतून ''आपला भाऊ, आपल्या सेवेत'' भाजपा कामगार मोर्चाच्या वतीने मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना व घरेलू महिला कामगार नोंदणी फॉर्म या सर्व योजनांचे ऑनलाईन फॉर्म भरण्याकरिता विनामुल्य सेवा सुविधा केंद्र संघर्षयोद्धा भाजपा जनसंपर्क कार्यालय, कॅनॉल रोड, बीड येथे आज सकाळी ११.०० वा शुभारंभ होत आहे. २१ ते ६५ वयोगटातील पात्र सर्व महिला भगिनींनी मोफत फॉर्म भरून घ्यावेत. असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केले आहे.

भाजपा राष्ट्रीय सचिव आ.पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांनी मध्यप्रदेश मधील लाडली बहना या योजनेच्या धर्तीवर महिलांचे वैयक्तिक आर्थिक सबलीकरण करण्याच्या हेतूने राज्यातील महिलांसाठी योजना तातडीने सुरू करावी अशी मागणी केली होती. त्यांच्या आग्रहानुसार राज्याचे मुख्यमंत्री ना. एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस, ना. अजित दादा पवार यांनी राज्यात ''मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना'' कार्यान्वित केली आहे. महिलांचे वैयक्तिक आर्थिक सबलीकरण करण्याच्या हेतूने दर महा १५०० हजार रुपय मानधन अर्ज दाखल केलेल्या महिलांना मिळणार आहेत. ही योजना राज्यात तातडीने सुरू केली असून, या योजनेचा लाभ घेण्यासाठी २१ ते ६५ वयोगटातील पात्र महिलांनी आपले फॉर्म ऑनलाईन भरणे आवश्यक आहे. महिलांच्या सुविधेसाठी आपला भाऊ आपल्या सेवेत ही संकल्पना घेऊन, भारतीय जनता पार्टीच्या वतीने राजेंद्र मस्के यांच्या संपर्क कार्यालयात मोफत ऑनलाईन फॉर्म भरण्याची सुविधा उपलब्ध केली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी पुढील कागदपत्रे महिलांनी सोबत आणावेत.आधारकार्ड, बँक पासबुक, मतदान कार्ड, केशरी किंवा पिवळे राशन कार्ड, पासपोर्ट फोटो, असल्यास शाळेचा दाखला या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती घेऊन याव्यात. ही सुविधा सकाळी ११ ते ०५ यावेळेत सुरु राहील.

## मुख्यमंत्री बहीण माझी लाडकी बॅनर वरील आ. नमीता मुंदडाचा फोटो फाडला,आरोपीला अटक करण्याची गावकऱ्यांची मागणी

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील चिंचोलीमाळी येथील शिवाजी चौकातमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सुरु केलेल्या माझी लाडकी बहीण या योजनेची माहीती गावातील पात्र महीलांना मीळावीयासाठी आ.नमीता मुंदडा यांनी केज तालुक्यातील सर्वच गावात या योजनेची माहीती असलेले बॅनर लावले होते.चिंचोलीमाळी येथील शिवाजी चौकात लावलेल्या बॅनरवरील आ. नमीता मुंदडा यांचा फोटो अज्ञात समाज कंटकाने जाणुन बुजून फाडुन अवहेलना केली आहे. त्यामुळे गावात जातीयतेढ निर्माण होऊन जातीय तणाव निर्माण होण्याची शक्यता आहे.तरी या प्रकरणी दोषी आरोपीचा शोध घेऊन त्याला अटक करावी व त्याचे विरूद्ध कायदेशीर कारवाई करावी.नसता चिंचोली माळी गावक-यांच्या वतीने आंदोलन छेडले जाईल असा इशारा तहसिलदार, उपविभागीय पोलीस अधिकारी व पोलीस निरीक्षक यांना गावक-यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.निवेदनावर

भाजपाचे जेष्ठ नेते सुनील गलांडे पाटील,पंचायत समीती सदस्य नारायण शिंदे,राम मेजर राऊत, चेअरमन अरुण काळे, व्हाईसचे अरमन आबासाहेब केदार,उप सरपंच धिरज वनवे,दगडु दळवे,रविंद्र गलांडे,मनोज गालफाडे,सेवा सहकारी सोसायटी सदस्य राजाभाऊ नखाते,ग्राम पंचायत सदस्य बालाजी राऊत,दत्ता राऊत,धनंजय शिंदे,फेरोज शेख, अभिजीत राऊत,भगवान काळे,बाबु राउत,त्रिंबक सारुक,राम राऊत,वचिष्ठ नेमक,गोपीनाथ राऊत, रामेश्वर राऊत,श्रीमंत राऊत,परमेश्वर राऊत, किशोर राऊत,राज राऊत, सोमनाथ काळे,मच्छिंद्र पुरी, शमशुद्दीनशेख,विजय माने,अजय यादव, ईश्वर पुरी,किशोर नखाते, शंकर काळे,महारुद्र लिगाडे, हरीभाऊ यादव,महादेव घोडके,आकाश मोहीते, सचिन जाधव,विठ्ठलझाडे, सुरेश कुदळे,दीलीपपवार, दत्तात्रय लिगाडे,विजय काळे,ग्रामपंचायत सदस्य सुरज गायकवाड,दीपक नखाते,लहु हुंबे,बाळु नखाते,संतोष वाघमारे, रामेश्वर नखाते,सुधाकर काटे,अशोक राऊत,जमीर शेख,चंद्रकांत भुजबळ यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

राज्य लोकतंत्र शेत-शिवार

मंगळवार दि.१६ जुलै २०२४ ४

# शेतकऱ्यांना मिळणार वार्षिक १०,००० रुपये ?

## अर्थसंकल्पातून पीएम किसान मध्ये मोठ्या बदलाचे संकेत

पुणे : केंद्रात राष्ट्रीय लोकशाही आघाडीने तिसऱ्यांदा सत्ता स्थापन केली. हे सरकार यंदा त्यांचा पहिला अर्थसंकल्प सादर करेल. अर्थमंत्री निर्मला सीतारमण या आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी महत्वपूर्ण घोषणा करतील. शेतकऱ्यांना या बजेटकडून मोठ्या अपेक्षा आहे. त्यांना खते आणि रसायनांवरील कर कपातीसह कर्ज माफीची अपेक्षा आहे. तर केंद्र सरकार त्यांना पीएम किसान योजनेचा हप्ता वाढवून दिलासा देण्याच्या प्रयत्नात आहे. सध्या पीएम किसान योजनेतंर्गत वार्षिक ६ हजार रुपये हप्ता मिळतो. या हप्त्यात भरघोस वाढीची योजना आहे.

अनेक अल्पभूधारक शेतकऱ्यांना पीएम किसान योजनेचा हप्ता वाढविण्याची अपेक्षा आहे. पीएम किसान सन्मान निधी योजनेचा हप्ता वाढविण्यात येऊ शकतो. सध्या त्यांना वार्षिक ६००० रुपये हप्ता मिळतो. तो वाढवून सरकार १०,००० रुपये करण्याच्या विचारात आहे. सध्या तीन हप्त्यात ही रक्कम देण्यात येते. सरकार चार हप्त्यात रक्कम देऊ शकते. पीएम किसान योजनेचा हप्ता वाढला तर शेतकऱ्यांना अनेक कामासाठी ही रक्कम उपयोगी पडेल. त्यांना खते, बि-बियाणे खरेदीसाठी त्याचा वापर करता येईल. केंद्र सरकारने



फेब्रुवारी २०१९ मध्ये शेतकऱ्यांन मदतीसाठी पीएम किसानची घोषणा केली होती. तिसऱ्यांदा पंतप्रधान झाल्यानंतर नरेंद्र मोदी यांनी पीएम किसान योजनेचा १७ वा हप्ता नुकताच जमा केला. किसान सन्मान निधीची योजनेत थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफरतंर्गत रक्कम जमा होते.

### स्वस्त दराने कर्ज द्या

शेतकऱ्यांना स्वस्त दराने कर्ज देण्यासाठी सरकारने एक स्वतंत्र एजन्सी नेमावी. त्यामाध्यमातून योग्य आणि पात्र शेतकऱ्यांना स्वस्त दराने कर्ज द्यावे. त्यासाठी डीबीटी माध्यमाचा वापर करावा अशी मागणी पण जोर धरत आहे. काही विकास कार्यक्रमासाठी शेतकऱ्यांची निवड करावी. त्यांना प्रशिक्षण द्यावा अशी मागणी करण्यात येत आहे. सध्याच्या ज्या काही शेतकरी विकास संस्था, बँका आहेत, त्यांचा शेतकऱ्यांना किती फायदा होतो, याची समीक्षा करण्याची मागणी होत आहे. तर एक मध्यस्थ नोडल संस्था उभारण्याची मागणी शेतकरी वर्ग करत आहे.

दर चार महिन्यांनी तीन हप्त्यात ही रक्कम जमा करण्यात येते. पण पात्रता निकष, त्यातील काही अटी आणि शर्तींमध्ये अडकलेल्या काही शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळत नाही. त्यामुळे आता सरकारने शेती अवजारे, ट्रॅक्टर, खत, रसायने आणि शेतीसंबंधीच्या इतर खरेदीवर सबसिडी द्यावी आणि ती डीबीटी माध्यमामार्फत थेट शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्याची मागणी पण जोर धरु लागली आहे.

# पपईच्या सुधारित जातींची संपूर्ण माहिती



पपईचे पीक हे जवळपास १० ते १३ महिन्यात तयार होते. पपईची लागवड जुलै ते सप्टेंबर किंवा फेब्रुवारी ते मार्च मध्ये केली जाते. अलीकडील काही वर्षात शेतकऱ्यांचा पपई लागवडीकडे कल वाढत चालला आहे. अशातच सुधारित पपई चे बियाणे निवडून लागवड केल्यास उत्पादन वाढू शकते अशी आशा व्यक्त केली जात आहे. पपई फळपीकाच्या उभयलिंगी व द्विभक्तलिंगी अशा जाती आहेत. उभयलिंगी जातीच्या लागवडीपासून अधिक उत्पादन मिळते. त्यामुळे लागवडीसाठी उभयलिंगी जातीच्या रोपांची खात्रीशीर रोपवाटिकेतून निवड करावी.

पपईच्या सुधारित जाती : १) कुर्ग हनीड्यू (मधूबिंदू) - चांगली उत्पादन क्षमता (प्रतिझाड प्रतिवर्ष ३० ते ४० फळे मिळतात). फळे लांब आकाराची असतात. गरामध्ये साखरेचे प्रमाण जास्त असल्याने चवीला अतिशय गोड असतात. २) पुसा डेलिशिअस - चांगली उत्पादन क्षमता व झाडाचे खोड मजबूत असते. फळे जमिनीपासून १६० सें.मी. उंचीपासून वर लागतात. प्रतिझाड प्रतिवर्ष ३० ते ४० फळे मिळतात. फळांचे सरासरी वजन १ ते १.२ किलो असते. साखरेचे प्रमाण १० टक्के असते. ३) पुसा डॉर्फ - झाडे ठेंगणी आणि जास्त उत्पादन देणारी आहेत. लागवडीनंतर झाडांना २३५ दिवसांपासून फळे लागतात. जमिनीपासून ४० सें.मी. उंचीपासून फळे लागतात. फळे मध्यम आकाराची व सरासरी वजन १ ते १.५ किलो असते. सोसाट्याचा वारा जेथे वाहतो तेथे ही लागवडीसाठी फायदेशीर ठरते. ४) रेड लेडी ७८६ - संकरित वाण पैकी एक. या जातीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे नर आणि मादी फुले एकाच वनस्पतीमध्ये तयार होतात. यामुळे प्रत्येक झाडाला फळे येतात. लागवडीनंतर ९ महिन्यांनीच झाडांना फळे येऊ लागतात. या जातीच्या फळांची साठवण क्षमता इतर जातींच्या तुलनेत जास्त आहे. ५) सी.ओ. ३ - झाडे उंच वाढतात. गराचा रंग लालसर असून, ब्रिक्स १४.६ टक्के असते. फळांचे सरासरी वजन ०.५ ते ०.८ किलो असते. प्रतिझाड प्रतिवर्ष ९० ते १२० फळे मिळतात. ६) वॉशिंग्टन- झाडे बुटकी असतात. फळे लांब, वर्तुळाकार असतात. फळांचे सरासरी वजन १.५ ते २ किलो असते. गर केशरी, चवदार व उत्पादनास चांगली जात आहे. ७) तैवान ७८५ आणि तैवान ७८६ - भरपूर उत्पादन क्षमता (प्रतिवर्ष प्रतिझाड १०० ते १२५ फळे). लागवड व तोडणी वर्षभर चालू असते. एकूण फळांपैकी ६० ते ७० फळे मोठ्या आकाराची व दुसऱ्या बाजारपेठेत पाठविण्यास योग्य असतात. फळांचे सरासरी वजन १ ते १.५ किलो पर्यंत असते. -प्रतिहेक्टरी फळांचे उत्पादन १००-१२४ टन मिळते. शुद्ध बियाणे वापरल्यास या जाती व्हायरस रोगाला बळी पडत नाहीत. ८) सी.ओ.२, सी.ओ.४, सी.ओ.५, सी.ओ.७ आणि सी.ओ.९ - या जाती पेपेन उत्पादनासाठी प्रसारित केलेल्या आहेत. त्यापैकी सी.ओ. ७ ही जात उभयलिंगी असून, बाकीच्या द्विभक्तलिंगी आहेत. ९) पुसा ड्वार्फ (पुसा १-४५ डी) - या जातीची झाडे ६ ते ६.५ फुट उंच असून नर व मादी फुलांची झाडे वेगवेगळी असतात.



# हळद आणि आदरक पिकातील कंदकुज नियंत्रण

अ) बुरशीजन्य कंदकुज : १) कंदकुज चे प्रथम लक्षणे ही कंदातील कोवळ्या फुटींवर लगेच दिसून येतात. २) प्रथम पानांचे शेंडे वरून व कडांनी पिवळे पडून खालपर्यंत वाळत जातात. ३) खोडाचा जमिनीलगतचा भाग काळपट पडतो. ४) याच ठिकाणी माती बाजूस करून पाहिल्यास गड्डा वरून काळा पडलेला व निस्तेज झालेला दिसतो. ५) प्रादुर्भावग्रस्त फुटवा ओढल्यास सहज हातामध्ये येतो. ६) या रोगामुळे साधारण उत्पादनात ५० टक्क्यांपेक्षा अधिक घट होते.

ब) जीवाणूजन्य कंदकूज : १) जीवाणूजन्य कंदकूज ओळखण्यासाठी रोगग्रस्त कंदाचा भाग धारदार ब्लेडने कापून स्वच्छ काचेच्या ग्लासमध्ये पाणी घेऊन त्याचे टोक त्यामध्ये बुडवावे. २) त्यामधून दुधासारखा स्राव पाण्यामध्ये आल्यास जिवाणूजन्य कंदकूज आहे हे ओळखावे.

हळद आणि आदरक कंदकूज व्यवस्थापन : १) कंद पोसण्याच्या कालावधीमध्ये हळदीला पाण्याची गरज मर्यादित असते. २) त्यामुळे सात महिने पूर्ण झाल्यानंतर हळदीस पाणी देण्याचा कालावधी हळूहळू कमी करत जावा. ३) आठ महिने पूर्ण झाल्यानंतर जमिनीच्या प्रकारानुसार पाणी बंद करावे. ४) त्यामुळे पानामधील अन्न कंदामध्ये उतरण्यास मदत होते व हळदीस उतारा चांगला मिळतो. ५) कंदकूज व्यवस्थापनासाठी जैविक बुरशीनाशक ट्रायकोडर्मा २ ते २.५ किलो प्रति एकरी ३०० किलो सेंद्रिय खतामध्ये मिसळून जमिनीमध्ये द्यावे किंवा ड्रीप असलीस ट्रायकोडर्मा २ लिटर प्रति एकरी द्यावे. याचा वापर प्रतिबंधात्मक म्हणूनच करावा. ६) कंदकूजीस सुरवात झाल्यानंतर ब्लिटॉक्स, टाटा रॅलीस इंडिया लिमिटेड, कॉपर ऑक्सिक्लोराइड ५० टक्के डब्ल्यू.पी. ४५ ग्रॅम प्रति १५ लिटर पाणी या प्रमाणात आळवणी करावी. ७) रोगाची तीव्रता जास्त असल्यास रेडोमिल गोल्ड, सिंजेंटा, मेटॅलॅक्सिल ४ टक्के + मॅंकोझेब ६४ टक्के डब्ल्यू.पी. (संयुक्त बुरशीनाशक) ४५ ग्रॅम प्रति १५ लिटर पाणी या प्रमाणात आळवणी करावी. ८) आले पिकामध्ये जिवाणूजन्य मर असल्यास सोबत २ मिली,कासु-बी, धानुका, कासुगामाइसिन ३ टक्के एस. एल. प्रतिलिटर पाणी या प्रमाणात आळवणी करावी. ९) आळवणी करताना जमिनीत वाफसा असावा. आळवणी केल्यानंतर पिकाला थोडासा पाण्याचा ताण द्यावा. १०) गरज वाटल्यास पुन्हा एकदा वरील औषधांची आळवणी करावी.

# भुईमुग पिकासाठी वरदान आहे जिप्सम

भुईमुग हे महत्त्वाचे गळीत धान्य पीक आहे. या पिकामध्ये उत्पादन वाढीसाठी मुख्य अन्नद्रव्ये म्हणजेच नत्र, स्फुरद आणि पालाश सोबतच जिप्समचा वाटा प्रमुख आहे. जिप्सममध्ये कॅल्शिअम (२४%) व गंधक (१८.६%) हे मुख्य घटक आहेत. हे दोन्ही घटक आऱ्याच्या वाढीसाठी आणि शेंगा पोसण्यासाठी उपयुक्त ठरतात.



जिप्समच्या वापराचे फायदे : जमिनीची सुपीकता वाढून ती भुसभुशीत होते. क्षारपड जमीन जिप्समच्या वापरामुळे सुधारते. बियाण्यांची उगवण क्षमता जिप्सममुळे वाढते. जिप्सममुळे पाण्यातील क्षारांचा निचरा होण्यास मदत होते. सेंद्रिय पदार्थ लवकर कुजतात. पिकाची अन्नद्रव्य शोषून घेण्याची क्षमता वाढते. फळांची, पिकांची गुणवत्ता सुधारते. भुईमुग पिकासाठी कॅल्शिअम व गंधक यांचा पुरवठा करण्यासाठी जिप्सम स्वस्त पडते. जिप्सममध्ये कॅल्शिअम (२४ टक्के) व गंधक (१८.६ टक्के) हे मुख्य घटक आहे. शेतकऱ्यांच्या शेतातील प्रात्यक्षिकामध्ये जिप्समचा उपयोग केलेल्या शेतामध्ये शेंगांचे उत्पादन वाढल्याचे आढळले.

जिप्सम वापर पद्धती : भुईमुगाची काढणी होईपर्यंत शेतात घातलेला जिप्सम संपतो. म्हणून दर हंगामात या पिकाला जिप्सम द्यावा लागतो. भुईमुगाच्या पेरणीपासून २५ ते ३५ दिवसांनी फुलधारणेवेळी प्रति हेक्टरी ५०० किलो जिप्सम द्यावा. जिप्समची बारीक भुकटी फूल धरण्याच्या अवस्थेत जमिनीच्या पृष्ठभागावर शक्य तितकी झाडांच्या बुंध्याजवळ पसरून द्यावी. कारण जमिनीच्या पृष्ठभागाच्या ५ सेंटिमीटर थरातील कॅल्शिअम, आऱ्या व पोसणाऱ्या शेंगांच्या उपयोगी पडतो. महत्त्वाचे म्हणजे, जिप्समचा वापर करण्यापूर्वी माती परिक्षण करून जमिनीचा सामू किती आहे त्यानुसार जिप्समची मात्रा ठरवावी. साधारणपणे ८ पेक्षा जास्त सामू असलेल्या जमिनीमध्ये इतर खतासोबत एकरी ३०० ते ५०० किलो जिप्समचा वापर करावा.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

६२२ : प्रेषित मुहम्मद पैगंबर यांनी मदिनेहून प्रयाण केले. चंद्रावर आधारित असलेल्या इस्लामिक (हिजरी) कॅलेंडरची या दिवसापासुन सुरूवात झाली.

१९४५ : अमेरिकेने तयार केलेल्या अणूबॉम्बची न्यू मेक्सिकोमधील लास अलमॉस येथील वाळवंटात चाचणी

१९५१ : ब्रिटन देशाने नेपाल देशाला स्वतंत्र घोषित केलं.

१९६५ : ईटली व फ्रान्सला जोडणार्या मॉंट ब्लॅंक बोगद्याचे उद्घाटन झाले.

१९६९ : चंद्रावर पहिला मानव उतरवणार्या 'अपोलो-११' अंतराळयानाचे फ्लोरिडा येथुन प्रक्षेपण

१९८१ : भारताने अणुबॉम्ब ची चाचणी केली.

१९९२ : भारताचे नववे राष्ट्रपती म्हणून डॉ. शंकरदयाळ शर्मा यांची निवड झाली. तत्पुर्वी ते उपराष्ट्रपती आणि महाराष्ट्राचे राज्यपाल होते.

१९९८ : गुजराथमधे शाळेतील प्रवेशाच्या वेळी पाल्याच्या नावानंतर आईलाही नाव लावण्याचा अधिकार आहे; असा निर्णय घेतल्याची माहिती गुजराथच्या शिक्षण राज्यमंत्री श्रीमती आनंदीबेन पटेल यांनी विधानसभेत दिली.

२००६ : संयुक्त राष्ट्र परिषदेने कोरिया राष्ट्रावर बंदी घालण्याच्या ठरावास मंजूरी दिली.

२००७ : बांगलादेशाच्या पूर्व पंतप्रधान शेख हसीना वाजीद यांना भ्रष्ट्राचार प्रकरणी कैद करण्यात आलं.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७२३ : सुप्रसिद्ध युरोपियन चित्रकार व रॉयल अकॅडमीच पहिले अध्यक्ष व्यंगचित्रकार सर जोशुवा रेनाल्ड्स यांचा जन्मदिन.

१७७३ : सर जोशुआ रेनॉल्ड्स ब्रिटिश चित्रकार व रॉयल ॲकॅडमीचे पहिले अध्यक्ष, व्यक्तिचित्रे काढण्याबद्दल त्यांची प्रसिद्धी होती. (मृत्यू: २३ फेब्रुवारी १७९२ लंडन, इंग्लंड)

१८९६ : नॉर्वे देशांतील प्रसिद्ध राजकीय राजकारणी, कामगार नेते सरकारी अधिकरी व लेखक तसचं, संयुक्त राष्ट्र संघाचे पहिले सरचिटणीस ट्रिग्वे हलवदान ली यांचा जन्मदिन.

१९०९ : अरुणा असफ अली स्वातंत्र्यसेनानी. ९ ऑगस्ट १९४२ रोजी त्यांनी मुंबईतील गोवालिया टॅंक मैदानावर तिरंगा फडकवला होता. लेनिन शांतता पुरस्कार, इंदिरा गांधी शांतता पुरस्कार, पद्मविभूषण, आंतरराष्ट्रीय सद्भावना पुरस्कार, भारतरत्न (मरणोत्तर) इ. पुरस्कारांनी त्यांना गौरविण्यात आले. (मृत्यू: २९ जुलै १९९६)

१९२३ : के. व्ही. कृष्णराव भूदल प्रमुख, जम्मू काश्मीर, नागालॅंड, मणिपूर व त्रिपूराचे राज्यपाल

१९१३ : स्वामी शांतानंद सरस्वती ज्योतिर्मठाचे शंकराचार्य (मृत्यू: ७ डिसेंबर १९९७ अलाहाबाद, उत्तर प्रदेश)

१९१४: वामनराव कृष्णाजी तथा वा. कृ. चोरघडे साहित्यिक (लघुकथा, लोककथा, बालवाङ्मय, चरित्र, अनुवाद), विचारवंत व स्वातंत्र्यसैनिक (मृत्यू: ३० नोव्हेंबर १९९५)

१९१७ : जगदीश चंद्र माथूर नाटककार व लेखक (मृत्यू: १४ मे १९७८)

१९४३ : प्रल्हाद ईरबाजी सोनकांबळे लेखक व इंग्रजीचे प्राध्यापक (मृत्यू: ६ जानेवारी २०१०)

१९६८ : धनराज पिल्ले हॉकी पटू

१९७३ : शॉन पोलॉक दक्षिण अफ्रिकेचा क्रिकेटपटू

१९८३ : ब्रिटीश वंशीय भारतीय हिंदी चित्रपट अभिनेत्री कतरिना कैफ यांचा जन्मदिन.

१९८४ : कतरिना कैफ चित्रपट कलाकार

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१३४२ : चार्ल्स (पहिला) हंगेरीचा राजा (जन्म:१२८८)

१८८२ : अमेरिकेचे माजी राष्ट्रपती अब्राहम लिंकन यांच्या पत्नी मेरी टॉड लिंकन यांचे निधन.

१९८६ : वासुदेव सीताराम तथा वा. सी. बेन्द्रे इतिहासकार (जन्म: १३ फेब्रुवारी १८९४)

१९९३ : उस्ताद निसार हुसेन खाँ पद्मभूषण (१९७०), रामपूर साहसवान घराण्याचे तराणा व ख्यालगायक, संगीत संशोधन अकादमीचे निवासी शिक्षक, आकाशवाणी कलाकार, उस्ताद राशिद खाँ यांचे गुरू (जन्म:१९०९)

१९९४ : नोबल पारितोषिक विजेता अमेरिकन भौतिकशास्त्रज्ञ ज्युलियन श्विन्गर यांचे निधन.

२००५ : रॅमन मॅग्सेसे पुरस्कार विजेता प्रसिद्ध भारतीय कन्नड भाषिक नाटककार आणि निनासम धर्म संस्था संस्थेचे संस्थापक के. वी. सुबन्ना यांचे निधन.

२००९ : पद्मभूषण व पद्मविभूषण पुरस्कार तसचं, संगीत नाटक अकादमी पुरस्कार सन्मानित भारतीय कर्नाटिक संगीतकार व तमिळ चित्रपट पार्श्वगायिका दमल कृष्णस्वामी पट्टममल यांचे निधन.

२०१३ : प्रसिद्ध भारतीय इतिहासकार व प्राध्यापक तसचं, सोशल सेंटर फॉर स्टडीज इन सोशलचे संस्थापक-संचालक बरुण डी यांचे निधन.

# नेटिवो बुरशीनाशक : डोस, उपयोग आणि फायदे

नेटिओ बुरशीनाशक हे एकत्रित टेब्युकोनाझोल आणि ट्रायफ्लॉक्सिस्ट्रोबिन असलेले बुरशीनाशक आहे. नेटिओ हे संरक्षणात्मक आणि उपचारात्मक कृतीसह एक पद्धतशीर ब्रॉड-स्पेक्ट्रम बुरशीनाशक आहे जे केवळ रोग नियंत्रणच देत नाही तर पिकाची गुणवत्ता आणि उत्पादन देखील सुधारते. नेटीओ हे एक आंतरप्रवाही विस्तृत गुणधर्म ज्यात संरक्षणात्मक आणि उपचारात्मक क्रियाशील बुरशीनाशक आहे जे रोगावर नियंत्रण ठेवण्या बरोबर पिकाच्या गुणवत्ता वाढवते.

क्रिया ची पद्धत : टेबुकोनाझोल हे डायमेथिलेस इनहेबिटर आहे. बुरशीजन्य पेशींच्या भिंतीची रचना तयार करण्याच्या प्रक्रियेत हस्तक्षेप करते. शेवटी ते बुरशीचे पुनरुत्पादन आणि पुढील वाढ रोखते. ट्रायफ्लॉक्सिस्ट्रोबिन वनस्पती रोगजनक बुरशीच्या श्वसन यामध्ये हस्तक्षेप करते.

फायदे : १) नेटिओ पानांचे ठिपके, तांबेरा, ब्लास्ट, अन्थ्रॅकनोज, डाउनी मिल्ड्यू, पावडर बुरशी आणि बरेच बुरशीजन्य रोगाच्या विस्तृत श्रेणी पासून संरक्षण करते. २) हे दीर्घकाळ टिकणारे संरक्षण प्रदान करते, पिके आठवडा ते महिन्यांपर्यंत सुरक्षित ठेवतात. ३) नेटिओ पिकाच्या आत आणि बाहेर दोन्ही पद्धतीने कार्य करते, सर्वसमावेशक संरक्षण प्रदान करते. ४) गहू, भात, मका, सोयाबीन, बटाटा, टोमॅटो, मिरे, काकडी, खरबूज, द्राक्षे, सफरचंद आणि लिंबूवर्गीय यासह विविध पिकांवर वापरण्यासाठी हे सुरक्षित आहे. ५) नेटिओ पिकांचे रोगांपासून संरक्षण करून आणि त्यांना कीटकांपासून अधिक प्रतिरोधक बनवून त्यांचे उत्पादन आणि गुणवत्ता सुधारण्यास मदत करू शकते.

फवारणी करताना घ्यावयाची काळजी : १) नेटिवो बुरशीनाशक वापरण्यापूर्वी लेबल व माहिती पत्रक वाचून खबरदारीच्या सर्व सूचनांचे पालन करावे. २) डब्यावरील लाल रंगाचे पतंगीच्या आकाराचे चिन्ह असलेली बुरशीनाशक सर्वात विषारी त्यानंतर पिवळा, निळा व हिरवा असा क्रम लागतो. ही चिन्हे सोपी व सर्वसाधारण, निरक्षर व्यक्तीसाठी समजण्यासाठी असतात. म्हणजेच हिरव्या रंगाचे चिन्ह असलेली बुरशीनाशक कमीत कमी विषारी असतात. ३) तणनाशक फवारणी पंप चुकूनही बुरशीनाशक फवारणी साठी वापरू नये. ४) फवारणी करतांना संरक्षक कपडे, बुट, हातमोजे, नाकावरील मास्क इत्यादीचा वापर करावा.



# लिंबागणेश प्राथमिक आरोग्य केंद्रातील मुख्य ईमारतीला गळती

## रूग्णांची हेळसांड ; जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.उल्हास गंडाळ यांना निवेदन








लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश प्राथमिक आरोग्य केंद्रात लिंबागणेश पंचक्रोशीतील १२ वाड्यातील गोरगरीब रुग्णांना आरोग्य सेवा पुरविणाऱ्या लिंबागणेश प्राथमिक आरोग्य केंद्राच्या मुख्य इमारतीतील स्लॅब खराब झाला असुन पावसाळ्यात थेंब थेंब पाणी टपकत असुन इमारत पुर्णतः जीर्ण झालेली आहे. इमारतीच्या स्लॅब मधुन पावसाचे पाणी झिरपत असल्याने सध्या तपासणी कक्ष,बाळंतिनी कक्ष, बाह्य रुग्ण विभाग, मिटींग हॉल,आंतररुग्ण विभाग,औषधी विभाग, व्हरांडा याठिकाणी पावसाचे पाणी साचत आहे.प्राथमिक आरोग्य केंद्रात येत असलेल्या खेड्यापाड्यातील गोरगरीब गरजु रूग्णांची हेळसांड होत असुन तातडीने दुरुस्ती करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिति आधिकार कार्यकर्ता डॉ.गणेश ढवळे यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद बीड डॉ.सुहास गंडाळ आणि मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड संगीतादेवी पाटील यांना निवेदनाद्वारे केली आहे. वार्षिक नियोजन निधीतून दुरुस्तीसाठी तरतूद करण्यात येईल असे आश्वासन डॉ.उल्हास गंडाळ यांनी दिले.

गेल्या ३-४ वर्षांपासून पावसाळ्यात प्राथमिक आरोग्य केंद्रातील मुख्य ईमारतीसह वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचारी निवासस्थानांची दुरावस्था असुन निवासस्थाने पुर्णपणे नादुरुस्त असुन पावसाळ्यात पुर्ण गळती लागलेली आहे.तसेत स्वच्छता गृहे नादुरुस्त असुन पावसाळ्यात साप व विंचू आढळून येतात.त्यामुळे तेथे वास्तव्य करण्यास अडचण निर्माण झाली आहे.

त्यामुळे वैद्यकीय अधिकारी मुख्यालयी राहु शकत नाहीत असे पत्र तत्कालीन वैद्यकीय अधिकारी डॉ.प्रतिभा रकटे यांनी दि.१४.०९.२०२१ रोजी जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद बीड यांना लेखी पत्रकाद्वारे कळविले होते.

परंतु अद्याप निवासस्थाने दुरुस्तीच्या प्रतीक्षेत असल्याचे लिंबागणेश प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी डॉ.रूपाली चिटकुलवार यांना सांगितले. जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद बीड डॉ.उल्हास गंडाळ यांनी आरोग्य विभागाच्या बांधकाम व देखभाल दुरुस्तीसाठी केवळ वार्षिक नियोजन निधीतून तरतूद करण्याची तरतूद असुन येत्या १५ दिवसात होणाऱ्या वार्षिक नियोजन बैठकीत याकडे प्राधान्याने लक्ष देऊन निधी उपलब्ध करून देण्यात येईल असे आश्वासन डॉ.गणेश ढवळे यांना दिले.

राज्याच्या आरोग्य विभागाची अवस्था दिवसेंदिवस दयनीय होत चालली असुन एकीकडे आरोग्य विभागाच्या रूग्णालय ईमारत बांधणीसाठी तसेच देखभाल व दुरुस्तीसाठी वित्त विभागाकडून पुरेसा निधी दिला जात नाही तर दुसरीकडे हजारोंनी रिक्त असलेली वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरली जात नाहीत.ग्रामीण भागातील आरोग्याची मदार असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्राची अवस्था अत्यंत वाईट आहे.याकडे शासनाने गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे.

---

### सोहळा कौतुकाचा सत्कार गुणवंतांचा कार्यक्रमांतर्गत

# तब्बल २०० गुणवंत सन्मानित



अंबाजोगाई । प्रतिनिधी

दिनांक १४ जुलै २०२४ रोजी नवक्षितिज बहुउद्देशीय शिक्षण संस्था संचलित स्वामी विवेकानंद बाल विद्या मंदिर अंबाजोगाई येथे माध्यमिक शालांत परीक्षेतील गुणवंत विद्यार्थी तसेच विविध स्पर्धा परीक्षेतील गुणवंतांचा बक्षीस देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी अध्यक्ष म्हणून नवक्षितिज बहुउद्देशीय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष संतोष कुलकर्णी उपस्थित होते. तर प्रमुख वक्ते म्हणून संदीप मुर्तडकर (दिल्ली सरकार द्वारा वि. प्र. प्रशिक्षक, अध्यक्ष मेरिट मेकर फाउंडेशन, अमरावती) तसेच डॉ. मंजुषा कुलकर्णी (प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई ) हे उपस्थित होते. त्याचप्रमाणे प्रमुख उपस्थिती म्हणून डॉ. योगेश सुरवसे सर ( अधिव्याख्याता शिक्षण प्रशिक्षण संस्था अंबाजोगाई, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी संघटना) तसेच मकरंद पत्की ( अध्यक्ष, दीनदयाळ नागरी सहकारी बँक अंबाजोगाई) त्याचबरोबर नवक्षितिज बहुउद्देशीय शिक्षण संस्थेच्या सन्माननीय सचिव तथा स्वामी विवेकानंद बाल विद्या मंदिर अंबाजोगाई येथील माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका आदरणीय स्वरूपा डिग्रसकर तसेच स्वामी विवेकानंद बाल विद्या मंदिर अंबाजोगाई येथील प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका दिपाली जाधव उपस्थित होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमापूजनाने करण्यात आली. पाहुण्यांच्या यथोचित स्वागत समारंभा नंतर संस्थेच्या सचिव आदरणीय स्वरूपा दिग्रसकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. याप्रसंगी माध्यमिक शालांत परीक्षेतील गुणवंत विद्यार्थी २३, सातारा सैनिक स्कूल ०३, नवोदय विद्यालय ०३, स्कॉलरशिप ०५, जूनियर आयएएस ११, एमटीएसई १३, एम. टी. एस. इ. वाडिया कॉलेज ०४, अक्षरगंगा ३७, एम. टी. एस. इ. ओलंपियाड ८७, डॉ. सी व्ही रमण ०८ तसेच राष्ट्रीय व राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा ०७ अशा तब्बल २०० विद्यार्थ्यांचा सन्माननीय मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देऊन कौतुक व सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या डॉक्टर मंजुषा कुलकर्णी यांनी जिद्द चिकाटी आणि आत्मविश्वास असेल तर कुठलीही गोष्ट अशक्य नाही असे मत व्यक्त केले. त्याचबरोबर संदीप मुर्तडकर यांनी विद्यार्थ्यांना चुंबकासारखे व्हा व आपल्या प्रतिभेने संपूर्ण जगाला आपल्याकडे आकर्षित करा, असा संदेश यावेळी दिला. प्रमुख उपस्थिती म्हणून लाभलेले डॉ.योगेश सुरवसे यांनी यशाला कुठलाही शॉर्टकट नाही, आणि यश मिळवायचे असेल तर आपल्या अंगी नम्रता असायला हवी असेही मत यावेळी त्यांनी व्यक्त केले.कार्यक्रमाचे अध्यक्ष संतोष कुलकर्णी यांनी कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप केला. याप्रसंगी विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे यशस्वी सूत्रसंचालन सहशिक्षिका प्रज्ञा शेलमूकर व निशिगंधा जोगदंड यांनी केले. अतिशय उत्साह पूर्ण वातावरणात कार्यक्रम संपन्न झाला.

---

# स्वच्छता निरीक्षक अभ्यासक्रमाच्या नियमित वर्गास सुरुवात

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरातील श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे मोदी लर्निंग सेंटर येथे स्वच्छता निरीक्षक (सॅनिटरी इन्स्पेक्टर) २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाच्या अभ्यासक्रमासाठी नियमित वर्गास सुरुवात झाली. यावेळी या नियमित वर्गाच्या उद्घाटन प्रसंगी संस्थेचे संस्थापक सचिव तथा ऑल इंडिया इन्स्टिट्यूट चे उपाध्यक्ष राजकिशोर मोदी, अभिजित गाडगे, विभागीय संचालक ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट, छत्रपती संभाजीनगर,समन्वयक मुकुंद पांडे, प्रा मुकेश वायचळकर हे उपस्थित होते.



या अभ्यासक्रमाच्या नियमित वर्गाची सुरुवात दीप प्रज्वलन व शिक्षणाची देवता सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्मेंट च्या वतीने मोदी लर्निंग सेंटर अंबाजोगाई येथे स्वच्छता निरीक्षक सत्र जून २०२४-२५ अभ्यासक्रमाच्या नियमित वर्गाचा उद्घाटन सोहळा सोमवार दि(१५) रोजी संपन्न झाला. याप्रसंगी संस्थापक सचिव राजकिशोर मोदी यांनी या अभ्यासक्रमात सहभागी विद्यार्थ्यांना शुभेच्छापर मार्गदर्शन केले. तालुक्याच्या ठिकाणी प्रथमच स्वच्छता निरीक्षक हा अभ्यासक्रम सुरू होत आहे. विद्यार्थ्यांना या आगोदर जर या अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण घ्यायचे असेल त्यासाठी पुणे, मुंबई छत्रपती संभाजी नगर आदी ठिकाणी जावे लागत होते. त्यामुळे येथील युवकांना व पालकांना नाहक आर्थिक भुर्दंड सोसावा लागत होता. नेमकी हीच अडचण लक्षात घेऊन ऑल इंडिया इन्स्टिट्यूट चा उपाध्यक्ष असल्याने आणि अंबाजोगाई चा रहिवासी असल्याने शहरातील युवकांना स्वच्छता निरीक्षक अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण घेता यावी यासाठी अंबाजोगाई शहरात हा अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी ऑल इंडिया इन्स्टिट्यूट या संस्थेकडे पाठपुरावा करून मागील दोन वर्षांपासून हा अभ्यासक्रम अंबाजोगाई शहरात सुरू करण्यात संमती मिळवली होती. यावर्षी सन २०२४-२५ सालच्या नियमित अभ्यासक्रमाची सुरुवात दि १५ पासून करण्यात आली. यंदाच्या या नियमित अभ्यासक्रमाची सुरुवात करतांना आपणास मनस्वी आनंद असल्याचे मोदी यांनी नमूद केले. अंबाजोगाई शहरात सुरु झालेल्या या अभ्यासक्रमामुळे बीड जिल्यासह , लातूर, धाराशिव या जिल्ह्यातील युवकांना मोठा फायदा होणार असल्याचे राजकिशोर मोदी यांनी यावेळी सांगितले.याप्रसंगी या कार्यक्रमास उपस्थित असलेले विभागीय संचालक अभिजित गाडगे यांनी देखील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर रोजगाराच्या संधी कुठल्या कुठल्या ठिकाणी उपलब्ध आहेत याबाबत सविस्तर माहिती दिली. अभ्यासक्रमात सहभागी झालेले सर्व विद्यार्थी , शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.

---

## डाक विभागाकडून आकर्षक राखी लिफाफे केवळ १० रुपयात

बीड । प्रतिनिधी

डाक विभागाकडून आकर्षक राखी लिफाफे केवळ दहा रुपयात मिळणार आहेत. रक्षाबंधन सणासाठी ज्या बहिणीला भावाकडे अथवा भावाला बहिणीकडे प्रत्यक्ष जाता येत नाही म्हणून डाक विभागाने 'विशेष राखी कवरची ' सुविधा उपलब्ध करुन दिली आहे.यामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे आकर्षक राखी कवर हे पोस्ट ऑफिसमध्ये प्रती नग केवळ १०/- रुपये या किमतीमध्ये उपलब्ध करून देत आहेत.

या कवरमध्ये राखी टाकून बहिणी आपल्या भावासाठी राखी पाठवू शकतात. जे भाऊ घराचा आर्थिक भार उचलण्यासाठी मोठ्या शहरात काम करतात, जे भाऊ सीमेवर राहून आपल्या देशाचे रक्षण करतात, जे भाऊ दुसऱ्या राज्यात जाऊन मजूरी करतात, जे भाऊ मोठया शहरात व्यवसाय करतात अशा प्रकारे अनेक कारणांनी ज्या बहिणी भावाला भेटू शकत नाहीत त्यांच्यासाठी हा विशेष उपक्रम.तसेच आजच्या व्हटसअॅप आणि ईमेल च्या काळात सर्वजन संदेश पाठवून किंवा व्हिडीओ कॉल करुन रक्षाबंधन साजरा करतात पण जर प्रत्यक्षात राखी देवून रक्षाबंधन साजरा करण्यात आला तर तो आनंद व्दिगुणीत होईल, तसेच जुन्या परंपराना उजाळा मिळेल. जिल्हयातील सर्व डाकघरे हे नागरिकांना सेवा देण्यासाठी सदैव अग्रेसर आहेत, तरी सर्व नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन बीड डाकघर विभागाचे अधिक्षक यांनी सर्व नागरिकास केले आहे.

---

## आद्रक काढणीसाठी मजूर मिळेना ; शेतकरी त्रस्त

लिंबागणेश । प्रतिनिधी

ग्रामीण भागातील शेतकरी ऊस, ज्वारी,बाजरी या पारंपरिक पिकांना फाटा देत केंद्र सुधारीत जाती, तंत्रज्ञान इत्यादींचा वापर करत दररोजच्या जेवणातील मसाल्यात महत्वाचे स्थान असणाऱ्या आल्या सारख्या मसाला पिकांची निवड करताना दिसत आहे. काळ्या जमिनीत रूंद वरंब्याची सपाट वाफे ३ बाय २ मीटर आकाराचे तयार करून दोन वरंब्यात ६० से.मी.अंतर ठेवतात तर गादी वाफ्यावर लागवड करताना ३ बाय १ मीटर आकाराच्या १५-२० से.मी.उंच वाफ्यावर लागवड करतात.आल्याचे गड्डे जमिनीत वाढत असल्याने सखोल पुर्व मशागत करणे गरजेचे असते.जमीन लोखंडी नागरांने ३०-४० से.मी.खोल उभी आडवी नांगरून घ्यावी लागते.कुळवाच्या पाळ्या देऊन माती भुसभुशीत करून घ्यावी लागते.हलक्या जमिनीत सपाट वाफे पद्धत तर मध्यम व भारी जमिनीत सऱ्यां वरंबे पद्धत वापरतात.हेक्टरी ४० गाड्यांपर्यंत (२०टन) शेणखत टाकावे लागते.



बीड तालुक्यातील मौजे मुळुकवाडी येथील शेतकरी छगन ढास यांनी २५ गुंठे क्षेत्रफळ असलेल्या जमिनीत आल्याची लागवड केली असुन त्यांना एकुण पावणे दोन लाख रुपये खर्च आला आहे.सध्या आल्याची काढणी सुरू असुन बाहेरगावाहून येळंबघाट येथुन मजुर आणावे लागत आहेत. वाळलेला पाला कापुन पाला पाचोळा वेचून घेणे, कुदळीने खोदुन आल्याच्या गड्ड्यांची काढणी करताना खणताना गड्यांना इजा होणार नाही याची काळजी घ्यावी लागते.आले वेचुन पाण्याने स्वच्छ धुवून गड्डे व बोटे (नवीन आले) वेगवेगळी करावी लागतात.भरपुर मेहनत असते.पिक अपचे भाडे १५०० रुपये आणि महिला मजुर प्रति दिन ३०० रुपये रोजगार द्यावा लागतो. विक्रीसाठी नांदेडला पाठवावे लागत असुन एका पिक अपला एका चकरेला ५००० रूपये खर्च येत असुन सध्या १० रुपये भाव असल्याने शेती परवडत नसल्याची खंतही आले उत्पादक शेतकरी छगन ढास यांनी बोलून दाखवली.

---


# सायकल कालबाह्य होण्याच्या मार्गावर

ज्योतीराम पांढरपोटे

माजलगाव:- पूर्वी शहरातले शहरात फिरण्यासाठी सायकलीचाच वापर होत असे परगावावरुन आलेल्यांना शहरातल्या शहरात फिरण्यासाठी नियोजित ठिकाणी जाण्यासाठी-येण्यासाठी भाड्याची सायकल घेण्याशिवाय पर्याय नसायचा आता सायकलीची जागा मोटरसायकलने घेतली आहे.आणि अनेकांकडे चारचाकी वाहने असल्यामुळे सायकल जवळ,जवळ कालबाह्य होण्याच्या मार्गावर आहे.

आजच्या घडीला सायकलीचेही प्रमाण कमी होत चालले आहे.पुर्वी सायकलींचा वापर सर्रास असायचा कामासाठी तसेच एका गावावरुन दुसऱ्या गावाला जाण्या-येण्यासाठी एका माणसाला सायकल नेहमी उपयोगी पडत असे कधी कधी डबल सीटही लोक जात-येत होते आता दुचाकीमुळे व इतर वाहतुकीच्या साधनांमुळे सायकलही काल बाह्य होण्याच्या मार्गावर आहे.क्वचीतच सायकल चालविणारे दिसतात.शाळकरी मुलांकडे,गारीगार, कुल्फी विकणाऱ्याकडे किंवा भंगार खरेदी करणारा कडे सायकली क्वचित दिसतात किंवा सायकलींग करणाऱ्या खेळाडूंकडे अथवा सायकलीचा व्यायाम करणाऱ्यांकडे सायकली दिसतात. सकाळी,सकाळी सायकलीत हावा भरणेसाठी पंप मारणेचे दृश्य दुर्मिळ झाले आहे.पूर्वी सायकल मार्ट असत तेथे भाड्याने सायकली मिळायच्या ते आता जवळ जवळ बंद झाले आहे.पुर्वी सायकलीच्या शर्यती असायच्या आता ते प्रमाण कमी झालेचे दिसून येत आहे.जसजसे यांत्रिकी करण वाढत आहे तसतसे सायकल कालबाह्य होण्याच्या मार्गावर आहे.

### यांत्रीकीकरण व आधुनिकीकरणांचा परीणाम



एव्हाना आमच्या घरी तेव्हा मोठी काळी अँटलस सायकल आणली , पण तिला स्टँडवरुन काढणं आणि लावणं यातचं अर्धी एनर्जी वाया जायची आणि वरुन वडिलधाऱ्याचा धाक खबरदार हात लाऊ नको सायकलला, गुडगे फुटुन येशील. तरी पण न जुमानता आम्ही घरचे बाहेर गेले की,ती मोठी सायकल सुध्दा हातात घेऊन धुम ठोकायचो पायडल वर पाय ठेऊन बँलेंस करायचं असं करत करत आम्ही कैची ( हाफींग ) शिकलो. नंतर नळी पार (फुल पायडल ) करुन नविन विक्रम घडवला.यानंतर सिट पर्यंतचा प्रवास एक नवीन अध्याय होता.नंतर सिंगल, डबल,हात सोडुन, कँरीअर वर बसुन चालवण्याचे सर्व स्टंट आम्ही तेव्हाच करुन चुकलो

-रामेश्वर सावंत

१९८०-९० चा काळ होता तो त्यावेळेस आम्ही लोकं भाड्याने छोटी सायकल घेत होतो. बहुधा ती लाल रंगाची असायची जिला कँरीअर नसायचे,ज्यामुळे तुम्ही कुणाला डबल सिट नेऊ नये हा उद्देश असायचा. भाडे जेमतेम ५० पैसे ते १ रू तास च्या आसपास होतं. दुकानदार भाडे पहिले घ्यायचा आणि आपले नाव त्याच्या रजिस्टर वर नोंदवायचा.घराच्या जवळ असे अनेकजण सायकल दुकानदार होते भाड्याचे नियम कडक असायचे.जसे पंक्चर झाली तर त्याचे वेगळे पैसे, तुटफुट आपली जबाबदारी.मग त्या सायकल वर आम्ही गल्लीतले युवराज सवार व्हायचो पुर्ण ताकदीने पायडल मारत,कधी हात सोडत बँलेंस करत , कधी खाली पडुन पुन्हा उठून चालवायचो. आपल्या गल्लीत येऊन सर्व मित्र आळीपाळीने सायकल चालवायला मागायचे. भाड्याच्या टाईमाचा लिमिट निघुन न जावा म्हणून तीन चार वेळेस त्या दुकानापासुन चक्कर व्हायची तेव्हा भाड्याने सायकल घेणं,हे आमच्या श्रीमंतीचे लक्षण होतं.स्वतःची लहान सायकल असणारे त्यावेळेस खुप रईसी झाडायचे.

गणेश लोहिया (व्यापारी) माजलगाव

---

## आषाढी एकादशी निमित्त नारायणगड येथे पोलीस बंदोबस्त देण्यात यावा



बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्राची धाकटी पंढरी म्हणून संबोधल्या जाणाऱ्या श्री क्षेत्र नारायण गड येथे आषाढी एकादशी निमित्त पहाटेपासूनच दर्शनासाठी भाविकांच्या लांबच लांब रांगा लागल्या जातात. पंचक्रोशीतील विविध गावांमधून वारकरी भाविक आषाढी वारी निमित्त विठुनामाचा जयघोष करत टाळ-मृदुंगाच्या गजरात दिंडीच्या माध्यमातून पायी चालत गडावर येतात.

जिल्ह्यासह विविध भागातून श्री क्षेत्र नारायणगड येथे भाविकांची मांदियाळी होते. अशा या परिस्थितीमध्ये यादिवशी कुठलाही अनुचित प्रकार होवू नये, भाविकांच्या सोयीसाठी, वाहतूक आणि पार्किंग व्यवस्था शिस्तीचे नियोजन राखण्याकरिता पोलीस बंदोबस्ताची नितांत आवश्यकता भासते. यासाठी आज दि. १५ जुलै रोजी दुपारी १.०० वाजताच्या दरम्यान दि. १७ रोजी आषाढी एकादशी निमित्त महाराष्ट्राची धाकटी पंढरी श्री. क्षेत्र संस्थान नारायणगड येथे पोलीस बंदोबस्त देवून प्रशासनाने सहकार्य करावे या मागणीचे निवेदन पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांना श्री क्षेत्र संस्थान नारायण गडाच्या वतीने देण्यात आले. याप्रसंगी श्री क्षेत्र संस्थान नारायण गडाचे विश्वस्त अनिलदादा जगताप, बळीराम गवते यांच्यासह सुनील अनभुले, दीपक काळे, नंदुकिशोर पिंगळे उपस्थित होते.

cmyk

राज्य लोकतंत्र

मंगळवार दि.१६ जुलै २०२४


# शिवसंग्रामच्या रोजगार मेळाव्यात ; ७८४ तरुणांना मिळाल्या नोकऱ्या

## सामाजिक बांधिलकी जोपासणारे शिवसंग्राम काल आज आणि उद्याही समाज उपयोगी काम करत राहील - डॉ. ज्योती मेटे

**बीड । प्रतिनिधी**

लोकनेते विनायकराव मेटे यांच्या सामाजिक कार्याच्या प्रेरणेतून आणि शिवसंग्रामच्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांच्या संकल्पनेतून बीड जिल्हा शिवसंग्रामच्या वतीने भव्य रोजगार मेळावा काल दि. १५ जुलै सोमवार रोजी आशीर्वाद मंगल कार्यालय, बार्शी रोड, बीड येथे संपन्न झाला यावेळी या रोजगार मेळाव्यास शिवसंग्रामच्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉ. ज्योती विनायकराव मेटे, कार्यक्रमाचे अध्यक्ष अजय जहेर पाटील, प्रभाकर कोलंगडे, रमेश पोकळे, शेख शफीक, शेख निजाम, प्रा. प्रमोद कुलकर्णी, अनिल घुमरे, सुहास पाटील, प्रा. सुभाष जाधव,ऍड.मनीषा कुपकर,बाळासाहेब हावळे, सचिन काळकुटे, फाटक सर, मनोज जाधव आदी उपस्थित होते.

उच्चशिक्षित व कौशल्य प्राप्त युवकांसाठी नोकरी आपल्या दारी हा आगळावेगळा उपक्रम शिवसंग्रामने आज राबवला शेकडो बेरोजगार युवकांना विनासायास नोकरी या मेळाव्यात मिळाली, सुरुवातीला सकाळ पासून सुरू असलेल्या पाऊसा मुळे संथ गतीने सुरू झालेल्या प्रक्रियेने दुपार नंतर वेग घेतला , हजारो बेरोजगार युवक, तरुण सहभागी झाले होते. यात ७८४ तरुण मुला, मुलींना पुणे,छत्रपती संभाजी नगर, नगर आणि नागपूर येथे रोजगार मिळाला राज्यातील ४० नामांकित कंपन्या यात सहभागी झाल्या

यावेळी बोलताना डॉ. ज्योती मेटे म्हणल्या की,सामाजिक बांधिलकी जोपासणारे लोकनेते विनायकराव मेटे साहेब





### बीडमध्येच रोजगार मिळाला याचा आनंद

या रोजगार मेळाव्यामुळे मला खूप लाभ झाला आहे. मेळाव्यातून मला रोजगार मिळाला असून मला बीडमध्येच रोजगार मिळाला याबद्दल मी खूप समाधानी आहे. याबद्दल मी डॉ.ज्योतीताई मेटे यांचे खूप खूप आभार व्यक्त करते.

सयल रमेश भिताडे, नोकरी मिळालेली तरुणी

### पालकांनी मानले डॉ. ज्योती मेटे यांचे आभार

आज तरुण मोठ्या प्रमाणात बेरोजगार आहेत त्यांच्यासाठी डॉ. ज्योती मेटे यांनी हा मेळावा आयोजित करून तरुणांच्या हाताला काम देत नोकऱ्या उपलब्ध करून दिल्या यात माझ्या मुलांनी देखील या रोजगार मेळाव्यात सहभाग नोंदवला यातून त्यांना नोकरी मिळाली त्याबद्दल त्यांचे खूप खूप आभार. -शुभांगी कल्याणकर, पालक

### ऊसतोड मजुरांचा जिल्हा असणाऱ्या बीडमध्ये परिवर्तनाची नांदी केली; शिवसंग्रामने बेरोजगार तरुणांसाठी राबविला अनोखा उपक्रम

### कुटुंबाचे आशास्थान असणाऱ्या शेकडो पाल्यांनी उंचावली पालकांची मान

हे व्यक्तिमत्व आज जरी आपल्यात नसलं तरी त्यांच्या मार्गाने सदैव आम्ही वाटचाल करत राहू आणि लोकहिताचे उपक्रम राबवत राहू ऊसतोड मजुरांचा जिल्हा अशी ओळख असणाऱ्या बीडमध्ये या रोजगार मेळाव्याच्या रूपाने परिवर्तनाची नांदी शिवसंग्रामने केली आणि या अनोख्या उपक्रमने आज शेकडो तरुणांना चांगल्या कंपन्यांत रोजगार उपलब्ध झाला त्यामुळे सामाजिक बांधिलकी जोपासणारे शिवसंग्राम काल, आज आणि उद्याही असेच काम करत राहील असे मत या वेळी त्यांनी व्यक्त केले.

यावेळी अजय जाहेर पाटील, प्रभाकर कोलंगडे, रमेश पोकळे, शेख शफीक, शेख निजाम, प्रमोद कुलकर्णी, नारायणराव काशीद यांनी क्रमशः आपले मनोगते व्यक्त केली.

देशाची भावी पिढी असणाऱ्या युवकांसाठी एक स्तुत्य उपक्रम शिवसंग्रामणे आयोजित केला याबद्दल अजय जाहेर पाटील यांनी कौतुक केले. या वर्षी पेक्षाही पुढील वर्षी शिवसंग्राम च्या वतीने आणखी भव्य मेळावा आयोजित केला जाईल असे मत शिवसंग्रामचे ज्येष्ठ नेते प्रभाकर कोलंगडे यांनी मत व्यक्त केले.स्वर्गीय विनायकराव मेटे यांनी सामाजिक कार्य करत असताना सामाजिक समतोल राखण्याचे काम केले. त्यांनी बीड मधील मंदिरांच्या विकासासोबतच शाहीनशावली दर्ग्याचा देखील विकास केला आणि त्याच पावलावर पाऊल ठेवत शिवसंग्राम ची वाटचाल सुरू आहे. असे मत शेख शफिक यांनी व्यक्त केले. सामूहिक विवाह सोहळे व्यसनमुक्ती अभियान आणि अन्य सामाजिक उपक्रम राबवत आज या रोजगार मेळाव्याच्या अनुषंगाने युवकांच्या हाताला काम देण्याचे ध्येय शिवसंग्रामने आखले आहे त्याला आमच्या शुभेच्छा आहेत. असे मत रमेश पोकळे यांनी व्यक्त केले. युवकांच्या हाताला काम देण्यासाठी शिवसंग्राम पुढे आले याचा मनस्वी आनंद आहे असे मत शेख निजाम यांनी व्यक्त केले.



बीड - महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. धनंजय मुंडे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना महात्मा फुले समता परिषदेचे राज्य उपाध्यक्ष ॲड. सुभाष राऊत व समता परिषद तालुकाध्यक्ष शितलदास आडसुळे दिसत आहेत.

# तट बोरगाव येथे राष्ट्रीय खाद्य तेल व तेलताड अभियान अंतर्गत शेतकरी प्रशिक्षण संपन्न



### फवारणी करतांना सुरक्षा साधने वापरण्याचे कृषी विभागाचे आवाहन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

खरीप हंगामामध्ये विविध पिकांच्या कीड रोग अन्नद्रव्य व्यवस्थापनासाठी शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागू नये या दृष्टीने प्रभारी तालुका कृषी अधिकारी विजयकुमार पवार यांच्या उपस्थितीत तट बोरगाव येथे राष्ट्रीय खाद्य तेल व तेलताड अभियान अंतर्गत शेतकऱ्यांसाठी शेतीविषयक कौशल्य प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले. सदर प्रशिक्षण ◀◀ पान ३ वर


# वीज वितरण व पाट बंधारे विभागाचा अवमेळ घोड्याचा माळ तांडयाची वीज गेली पाण्यात

### आंधळ दळत अन कुत्रे पीठ खाते वीज वितरण व पाटबंधारे विभगाचा अवमेळ

**धारूर । प्रतिनिधी**

तालुक्यांतील पाची पिंपळा / सुरनरवाडी तलावाची धार कोंडली आहे. पाची पिंपळा तांडयाचे रडत पडत पुनर्वसन झाले. परंतू याच तांडयातून शेजारच्या घोड्याचा माळ तांडयावर वीज पुरवठा जातो हे ना वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांना कळले ना पाठ बंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांना कळले

पण आता तलावाची धार कोंडल्यामुळे तारा व पोल पाण्यात पोहत आहेत. त्या मुळे घोड्याचा माळ तांडयावर जाणारा वीज पुरवठा बंद झाला आहे. अधिकाऱ्यांच्या अज्ञानपणा मुळे ऐन पावसाळयात वीज बंद झाल्याने नागरीक हैराण झाले आहेत.तरी दोन्ही विभागांनी आपली चूक दुरूस्त करून दि.२५/७/२०२४ पर्यंत घोड्याचा ◀◀ पान ३ वर



# वषारी औषध पाजून सुनेचा खून तर सासूचाही संशयास्पद मृत्यू; गेवराई तालुक्यातील जोडवाडी येथील घटना

**फुलसांगवी । प्रतिनिधी**

लग्नामध्ये ५ लाख रुपये हुंडा व लग्नातील मान पान न दिल्याच्या कारणावरून सुनेला विषारी औषध पाजून खून पती, सासू आणि यांनी सुनेचा खून घटना रविवार दि. १४ जुलै रोजी सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली होती. सुनेच्या मृत देहाचे शवविच्छेदन होण्याच्या आतच सासूचा ही संशयास्पद मृत्यू झाल्याची घटना सोमवार दि. १५ जुलै रोजी सकाळी ७ वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली आहे. सुनेचा खून व १२ तासाच्या आतच सासूचाही संशयास्पद मृत्यू झाल्याने परिसरामध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

अंबड तालुक्यातील दहीपुरी या गावातील प्रतीक्षाचा चार वर्षांपूर्वी गेवराई तालुक्यातील जोडवाडी या गावात संदीप सखाराम कोकाटे यांच्याशी विवाह झाला होता. या विवाह नंतर सासू कुंता सखाराम कोकाटे, सासरा सेवानिवृत्त शिक्षक सखाराम उत्तमराव कोकाटे, नवरा डॉ. संदीप सखाराम कोकाटे यांच्याकडून पाच लाख रुपये हुंडा व लग्नातील मानपान यासाठी छळ होऊ लागला. तुझ्या आई-वडिलांकडून पैसे का आणत नाहीस असे म्हणून तिला रविवार दि. १४ जुलै रोजी जबरदस्तीने विषयी औषध पाजण्यात आले. व प्रतीक्षाने विषारी औषध पिऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याचा बोभाटा केला. प्रतीक्षा ला उपचारासाठी बीडच्या रुग्णालयाकडे घेऊन जात असताना रस्त्यातच तिचा दुर्दैवी मृत्यू झाला. प्रतीक्षेच्या मृतदेहावर शव विच्छेदन होण्यापूर्वीच सासू कोणता सखाराम कोकाटे या महिलेचाही राहत्या घरामध्ये संशयास्पद मृत्यू झाल्याची घटना सोमवार दि. १५ जुलै रोजी सकाळी सात वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली आहे. सून प्रतीक्षा कोकाटे हिचा भाऊ हर्षद संतोष कळंबे यांच्या फिर्यादीवरून आरोपी नवरा संदीप कोकाटे, सासरा सखाराम कोकाटे व मयत सासू कुंता कोकाटे या तिघांच्या विरोधात सुनेला विषारी औषध पाजून तिची हत्या केल्याच्या आरोपाखाली चकलांबा पोलिसात गुन्हा दाखल ◀◀ पान ३ वर

# उन्हाळ्यात पैसे उचललेल्या काही रस्त्यांची कामे आता सुरू झाली

## महिलांनो, गावकऱ्यांनो जागे व्हा -ॲड. अजित देशमुख

**बीड । प्रतिनिधी**

रोजगार हमी योजनेतील मजुरांचे पैसे उन्हाळ्यात उचलले. मात्र ही कामे झाली नव्हती. त्यापैकी काही रस्त्यांची कामे उन्हाळ्यात पैसे उचलल्यानंतर जन आंदोलनाच्या दट्ट्याने आता चालू झाली आहेत. या गंभीर बाबी असताना प्रशासन अजूनही झोपलेले आहे. त्यामुळे जनतेने जागे होऊन जिल्हाभरात अशी सुरू होत असलेली कामे तात्काळ रोखण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन जन आंदोलनाचे विश्वस्त ॲड. अजित एम. देशमुख यांनी केली आहे.

रोहयोच्या कामांमध्ये घोटाळ्यांबाबत आम्ही काम सुरू केल्यानंतर चौकशी समित्या नेमल्या गेल्या. अनेक अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना धक्का बसला. जनतेमध्ये मोठ्या प्रमाणात चांगली चर्चा सुरू झाली. प्रत्येक गावकरी आपल्या गावात काही घडते का ? याबाबत विचार करू लागला. मात्र त्याचबरोबर पैसे उचलून कामे न करणारी मोठी यंत्रणा आता कामाला लागली आहे. अनेक गावांमध्ये जे.सी.बी., पोकलेन फिरू लागले आहेत.

गावात गडबड होत असताना आता जी कामे तातडीने हाती घेतली जात आहेत, ही काम रोखण्यासाठी त्या गावातील जनतेने पुढे येणे आवश्यक आहे. गेवराई तालुक्यात अनेक गावामध्ये रस्त्यांची कामे मंजूर झाली होती. काही आठवड्याचे मस्टर उचलले होते. मात्र ती कामे झाली नाहीत आणि तुमच्या दट्याने ती कामे सुरू झाली आहेत, असे आम्हाला सांगितले आहे. त्यामुळे ज्या ज्या ठिकाणी जिल्हाभरात अशी कामे आता गडबडीने होत आहेत. तेथील जनता का झोपली आहे ? हा प्रश्न आम्हाला पडत आहे. न झालेली ◀◀ पान ३ वर

# बीड जिल्ह्यात ३ महसूल मंडळात अतिवृष्टी, पाच तालुक्यात दिलासादायक पाऊस

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात दोन दिवसांपासून पावसाची संततधार कायम आहे. आज सोमवारी (दि.१५) सकाळी ८ वाजेपर्यंत जिल्ह्यात गत २४ तासात २७.६ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. या दरम्यान बीड तालुक्यातील पिंपळनेर व नवगण राजुरी तसेच वडवणी तालुक्यातील कवडगाव महसूल मंडळात अतिवृष्टी झाली आहे.

बीड जिल्ह्यात मागील २४ तासात २७.६ किलोमीटर इतका पाऊस झाला आहे. सर्वाधिक ५३.८ मिलिमीटर पाऊस वडवणी तालुक्यात झाला असून त्या पाठोपाठ बीड ४७.८, पाटोदा ४०.७, आष्टी ८.१, गेवराई २०.१, माजलगाव १७.१, अंबाजोगाई २८.७, केज २५.६, परळी १३.९, धारूर ३१.९ आणि शिरूरकासार तालुक्यात ३०.७ मिलिमीटर पाऊस झाला आहे.पावसामुळे शेत शिवारात पाणी साचल्याचे दिसून आले. उडीद, मूग या तिमाही पिकासाठी हा पाऊस महत्वाचा ठरला आहे. असे असले तरी जिल्ह्यातील १४३ प्रकल्पांपैकी अनेक प्रकल्प अजूनही कोरडे आहेत तर काही प्रकल्पांची पातळी जोत्याखाली गेलेली आहे. माजलगाव या जिल्ह्यातील सर्वात मोठ्या प्रकल्पातही सध्या उपयुक्त पाणीसाठा शिल्लक नाही, त्यामुळे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागण्यासाठी सर्व प्रकल्प भरणे आवश्यक असून त्यासाठी मोठ्या पावसाची गरज आहे.

सरासरीच्या तुलनेत ५२.१ टक्के पाऊस बीड जिल्ह्याच्या पावसाची वार्षिक सरासरी ५६६.१ मिलिमीटर इतकी आहे. जिल्ह्यात सध्या जून ते सप्टेंबर २०२४ या कालावधीत पडणाऱ्या ◀◀ पान ३ वर

# दिंद्रुड येथे सर्वांगसुंदर मंदिरात शुभन महागणपतीची प्रतिष्ठापना

### डॉ.ओमप्रकाश शेटे यांची संकल्पपुर्ती

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

परळी - बीड महामार्गावर डॉ ओमप्रकाश शेटे ऑरगॅनिक फार्म परिसरात नव्यानेच बांधण्यात आलेल्या सर्वांगसुंदर मंदिरात शुभन महागणपतीची प्रतिष्ठापना विधिवत पूजा अर्चा करून करण्यात आली. दोन दिवस चाललेल्या या आध्यात्मिक कार्यक्रमात शोभायात्रा, होमहवन आदी धार्मिक कार्यक्रमासोबतच शेटे परिवाराच्यावतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

या निमित्ताने डॉ. ओमप्रकाश शेटे यांची मंदिर उभारणीची संकल्पपूर्ती झाली आहे. यावेळी हजारो भाविक भक्तांनी नव्यानेच स्थापित झालेल्या गणरायाचे भक्तिभावाने दर्शन घेतले.





माजलगाव व धारूर तालुक्याच्या संगमावर आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे प्रमुख सौ.शिल्पा व डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी राजस्थानी लाल दगडात गणपतीचे सर्वांग सुंदर मंदिर बांधले आहे. निसर्गरम्य वातावरणात संगम शिवारातील शिवमंगल नगर येथे या मंदिराची उभारणी करण्यात आली आहे. राजस्थानी कलाकारांनी तब्बल तीन वर्ष अथक मेहनत घेऊन दगडांवर आकर्षक कलाकुसर करून मंदिराची निर्मिती केली आहे. सदरील मंदिरात स्वामीजींच्या मंत्रोच्चारात विधिवत पूजाअर्चा करून शुभन महागणपतीची प्रतिष्ठापना करण्यात आली.प्राणप्रतिष्ठेच्या निमित्ताने ◀◀ पान ३ वर

### मंदिर दर्शनासाठी खुले आहे

कुठलेही कार्य निर्विघ्न पार पडावे यासाठी विघ्नहर्ता श्रीगणेशाचे स्मरण केले जाते. गणपती ही बुद्धीची देवता आहे. त्याच्या दर्शनाने सद्बुद्धी प्राप्त होते. दिंद्रुड पंचक्रोशीत व परळी बीड महामार्गावर जवळपास गणपतीचे मंदिर नाही. त्यामुळे दर्शनासाठी गणेशभक्तांची सोय व्हावी व गजाननाचे मनमोहक रूप डोळे भरून पाहता यावे यासाठी शुभम महागणपतीची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे. विघ्नहर्ताच्या कृपादृष्टीने आपल्या आयुष्यातील सर्व कष्ट दूर होतील. सर्वांसाठी हे मंदिर खुले असणार आहे तेव्हा प्रवाशांनी व पंचक्रोशीतील नागरिकांनी दर्शनाचा लाभ घ्यावा.

- डॉ. ओमप्रकाश शेटे (प्रमुख - आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समिती)

# पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण



**माजलगाव । प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे कृषीमंत्री तथा बीड जिल्हाचे पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त दि १५ जुलै सोमवार रोजी आमदार प्रकश सोळंके व जयसिंग सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे बीड जिल्हा उपाध्यक्ष सलीम शेख यांनी माजलगाव धरण मैदान येथे वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

यावेळी वृक्षारोपण करताना दिगंबरराव सोळंके,सतिष चाळक,गोविंद टाकणखार, विशाल साळवे, फेरोज सर, करमा चाऊस, जुबेर खान,शेख नासेर आदि उपस्थित होते.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

# पोलिस येऊन गेल्यानंतर खेडकर कुटुंबीयांच्या घराला भलंमोठं कुलूप


**पुणे । प्रतिनिधी**

वादग्रस्त आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांच्या आई, मनोरमा अद्याप पुणे पोलिसांसमोर हजर झाले नसून त्यांच्या बंगल्याला भलं मोठं कुलूप लावण्यात आल्याचं समोर आलं आहे. पोलिस येऊन गेल्यानंतर हे कुलूप कुणी लावलं असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

सोमवारी सकाळी पुणे ग्रामीण पोलिसांचं पथक या बंगल्यावर दाखल झाले होते, मात्र त्यांना घरातून कोणीही प्रतिसाद दिला नव्हता. मात्र आता या बंगल्याला एक मोठं कुलूप लावण्यात आले आहे. हे कुलूप नेमके कोणी लावले? पोलिस येऊन गेल्यानंतर हे कुलूप कधी लावले असा प्रश्न उपस्थित होत आहे.

याबाबत माहिती देताना पोलिस म्हणाले, आम्ही त्यांचा शोध घेत आहोत. त्यांचे मोबाईल देखील बंद आहेत. ते सापडल्यानंतर आम्ही कायदेशीर कारवाई करू. जो गुन्हा झाला आहे त्याबाबत आम्ही त्यांना काही प्रश्न विचारून माहिती घेऊ. एकूण ७ जणांवर गुन्हा दाखल





करण्यात आला आहे. त्यातील काहीचे मोबाईल नंबर आमच्याकडे नाहीत. त्या सर्वांचा शोध सुरू आहे. आम्ही त्यांचा शोध घेत आहोत.

पूजा खेडकर यांच्या आई मनोरमा खेडकर यांच्यावर पौड पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने पौड पोलिसांचं एक पथक बाणेर रस्त्यावर असलेल्या खेडकर यांच्या घराची पाहणी करून गेलं. खेडकर कुटुंबानं कुठलाही प्रतिसाद न दिल्यानं पोलिस निघून गेले. त्यामुळे पूजा खेडकर यांच्या आई मनोरमा खेडकर यांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे.

मनोरमा खेडकर यांनी बंदुकीने शेतकऱ्यांना धमकावण्याचा व्हिडीओ समोर आला होता. त्यानंतर पौड पोलिसांनी मनोरमा खेडकर यांच्यासह काही जणांवर गुन्हा दाखल केला आहे. पौड पोलिस यासंदर्भात मनोरमा खेडकर यांची चौकशी करण्यासाठी आले होते. पण त्यांच्या घरी कुणीही नसल्याने पोलिस परत आले. आता त्यांच्या घराला कुलूप लावण्यात आलं आहे. त्यामुळे आता पोलीस पुढील काय कारवाई करणार हे पाहवं लागेल.

**पूजा खेडकरांची कागदपत्रं सापडली**

वादग्रस्त आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांना जिल्हा शासकीय रुग्णालयातून २०१८ मध्ये नेत्र दिव्यांग प्रमाणपत्र आणि २०२० मध्ये मानसिक आजारी असल्याचं प्रमाणपत्र देण्यात आलं होतं. या प्रमाणपत्रांबाबतची कागदपत्रं सापडली आहेत. अहमदनगरचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय घोगरे आणि जिल्हाधिकारी,पोलीस अधीक्षकांमध्ये बैठक पार पडली. पूजा खेडकर यांनी सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये कोणत्याही प्रकारची खाडाखोड झाली नसल्याचं डॉ. घोगरे यांनी सांगितलं.

# नेरे येथे नव्याने बांधलेला पूल खचला

**भोर । प्रतिनिधी**

कापूरव्होळ-भोर-मांढरदेवी रस्त्याच्या सुरू असलेल्या सिमेंट कॉंक्रिटीकरण कामातील २ महिन्यांपूर्वीच बांधलेला गोकवडी-नेरे गावच्या हद्दीतील उंबरीची ओहोळ येथील पूल पहिल्याच पावसात रविवारी (दि. १४) सकाळी अचानक खचला. तर ठेकेदाराचा एक डंपरदेखील पुलाच्या साइडपट्टीवर खचला. रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याची तक्रार स्थानिक ग्रामस्थांनी संबंधित ठेकेदार, अधिकार्यांना यापूर्वीच केली आहे.



गेल्या ६ महिन्यांपासून या रस्त्याचे काम टप्प्याटप्प्याने होत आहे. दरम्यान, भोर ते आंबाडे १० किलोमीटर अंतरावरील सिमेंट क्रॉंक्रिटीकरणाचे काम सुरू आहे. मात्र, रस्त्यासह पुलांची कामे निकृष्ट होत असल्याच्या तक्रारी ग्रामस्थ वेळोवेळी ठेकेदारांना करत होते. मात्र, काम चांगल्या पध्दतीने होत असल्याची बतावणी ठेकेदाराकडून केली जात होती.

आता पहिल्याच पावसात गोकवडी-नेरे गावच्या हद्दीतील उंबरीची ओहोळ येथील पूल पहिल्याच पावसात कोसळला. गेल्या २ महिन्यांपूर्वीच हा पूल उभारण्यात आला होता. तर ठेकेदाराचा एक डंपरदेखील पुलाच्या साइडपट्टीवर खचला गेला. त्यामुळे याला सर्वस्वी जबाबदार कोण? असा सवाल ग्रामस्थांनी संबंधित ठेकेदार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी यांना विचारला आहे.

रस्त्याच्या कामामुळे नेरे, आंबाडे, गोकवडी, खानापूर, भाबवडी या ठिकाणच्या शेतकर्यांच्या शेतांमध्ये दगड-गोटे, तोडलेल्या झाडांच्या फांद्या पडल्या असल्याने शेतकर्यांना यंदाच्या वर्षी खरीप हंगामातील पिकांचे उत्पन्न घेता येणार नाहीत. तर शेतात पीक घेणे मुश्कील झाले आहे. वाहतुकीस येणार्या अडचणी टाळून रस्त्याचे काम जबाबदारीने उत्कृष्ट करावे, अशी मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे

# खडकवासलात दीड टीएमसी वाढ

**वेल्हे । प्रतिनिधी**

पानशेत-वरसगाव धरणक्षेत्रासह मुठा खोरे, सिंहगड परिसरात मुसळधार पाऊस पडल्याने खडकवासला धरणसाखळीत गेल्या २४ तासांत जवळपास दीड टीएमसी पाण्याची भर पडली. रविवारी (दि. १४) सायंकाळी पाच वाजता धरणसाखळीतील चारही धरणांत १०.१२ टीएमसी म्हणजे ३४.७१ टक्के पाणीसाठा झाला होता.

गतवर्षीच्या तुलनेत धरणसाखळीत जवळपास दोन टीएमसी अधिक पाणीसाठा आहे. गेल्या वर्षी १४ जुलै रोजी धरणसाखळीत ८.३४ टीएमसी म्हणजे २८.६२ टक्के पाणी होते. खडकवासला धरणाची पाणीपातळी ६० व पानशेतची पाणीपातळी ४० टक्क्यांपेक्षा अधिक झाली आहे. शनिवारी (दि. १३) सायंकाळी पाच



वाजता खडकवासला धरणसाखळीत ८.६८ टीएमसी पाणी होते. त्यात १.४४ टीएमसीची भर पडली.

शनिवारी सकाळी सहा ते रविवारी सकाळी सहा वाजेपर्यंतच्या २४ तासांत टेमघर येथे विक्रमी १०५, तर पानशेत येथे ९१, वरसगाव येथे ८५ व खडकवासला येथे ५० मिलिमीटर इतका पाऊस पडला. यंदाच्या पावसाळ्यातील हा सर्वाधिक पाऊस आहे.

रायगड जिल्ह्याच्या हद्दीवरील दापसरे, तव परिसरात लागोपाठ दोन दिवसांपासून मुसळधार पाऊस पडत आहे. सिंहगड परिसर मुठा खोर्यातही संततधार सुरू आहे. त्यामुळे आंबी, मोसे, मुठा नद्यांसह ओढे-नाले दुथडी भरून वाहत आहेत. पावसाचा जोर कायम राहिल्यास खडकवासला धरण दोन दिवसांतच भरून वाहील, असा अंदाज जलसंपदा विभागाने व्यक्त केला आहे.

पानशेत, वरसगावमध्ये पाण्याची चांगली वाढ सुरू आहे. पानशेतची पातळी सायंकाळी चाळीस टक्क्यांपेक्षा अधिक झाली आहे. दोन दिवसांत धरण पन्नास टक्के भरण्याची शक्यता आहे.

# राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून विदेशी मद्यासह २१ लाख ६९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

**पुणे । प्रतिनिधी**

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पुणे विभाग भरारी पथकाने केलेल्या कारवाईत नीरा गावच्या (ता. पुरंदर) हद्दीत १३ लाख ८२ हजार ४०० रूपये किंमतीच्या गोवा राज्य निर्मित विदेशी मद्यासह एकूण २१ लाख ६९ हजार ४०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

नीरा- लोणंद मार्गावर नीरा येथील पालखीतळाजवळ वाहनांच्या तपासणीदरम्यान अशोक लेलॅण्ड कंपनीचे बडा दोस्त मॉडेलच्या चारचाकी टेम्पो वाहन क्र. एमएच ०३- सीव्ही ९४६८ मध्ये गोवा बनावटीच्या विदेशी मद्याच्या १८० मि.ली. क्षमतेच्या ७ हजार ६८० बाटल्या असलेले १६० खोके जप्त करण्यात आले. वाहनातील इसमांकडे मद्य वाहतुकीसंदर्भातील कोणतेही परवानगीपत्र, परवाने अथवा कोणतीही कागदपत्रे आढळून आली नाहीत. जप्त वाहनासोबत असलेल्या जुलवा जि.सुरत आणि दहिसर पूर्वच्या दोन इसमांना अटक करून त्यांच्या विरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ अंतर्गत विविध कलमांतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला आहे. या कारवाईत दुय्यम निरीक्षक ए. बी. पाटील, व्ही. एम. माने आदींनी सहभाग घेतला असून पुढील तपास ए. बी. पाटील करत आहेत, अशी माहिती भरारी पथकाचे दुय्यम निरीक्षक श्री. पाटील यांनी दिली आहे.

# देगलूरकर यांच्या पुस्तकाचे येत्या शनिवारी प्रकाशन

**पुणे । प्रतिनिधी**

मंदिरस्थापत्य व मूर्तिशास्त्राचे अभ्यासक डॉ. गो. बं. देगलूरकर लिखित 'अथातो बिंब जिज्ञासा' या पुस्तकाचे प्रकाशन कोथरूड येथील बालशिक्षण मंदिर प्रशालेच्या एम. ई. एस. ऑडिटोरियम येथे सकाळी १० वाजता होणार आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांच्या पुस्तकाचे प्रकाशन करतील, अशी माहिती स्नेहल प्रकाशनाचे संचालक रवींद्र घाटपांडे यांनी दिली. या पुस्तकात महाराष्ट्रातील वैशिष्ट्यपूर्ण मूर्तींची माहिती तसेच रंगीत छायाचित्रे आहेत. मूळ पुस्तक डॉ. देगलूरकर यांनी इंग्रजीत लिहिले असून त्याचा मराठी अनुवाद आशुतोष बापट यांनी केला आहे.

# येरवडा जेलमधून पळाला खुनाच्या गुन्ह्यातील कैदी

**पुणे । प्रतिनिधी**

खुनाच्या गुन्ह्यात जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या कैद्याने येरवडा येथील खुल्या कारागृहातून पलायन केल्याची घटना समोर आली आहे. येरवडा पोलिस या पसार झालेल्या कैद्याचा शोध घेत आहेत.

आत्माराम ऊर्फ आत्म्या लाडक्या भवर (वय ३४) असे पसार झालेल्या कैद्याचे नाव आहे. भवर हा मूळचा पालघर जिल्ह्यातील वाडा तालुक्यातील देवीपाडा येथील रहिवासी आहे. त्याने २००९ मध्ये देवीपाडा गावात एकाचा खून केला होता. या प्रकरणी त्याच्याविरुद्ध शहापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता. या गुन्ह्यात न्यायालयाने आरोपी भवरला




१० जुलै २०१२ रोजी जन्मठेप आणि दोन हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली होती.

भवरची येरवडा कारागृहात रवानगी करण्यात आली. त्याची वर्तणूक चांगली असल्यामुळे कारागृह प्रशासनाने त्याची खुल्या कारागृहात रवानगी केली होती. कारागृहातील पोलिस कर्मचारी तौसिफ सय्यद यांनी शनिवारी सायंकाळी कैद्यांची हजेरी घेतली. त्यावेळी भवर आढळून आला नाही. कारागृह पोलिसांनी त्याचा खुल्या कारागृहात शोध घेतला. त्यानंतर कारागृह अधिकारी हेमंत पाटील यांनी येरवडा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यावरून भवर याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# 'इंद्रायणी'च्या पातळीत वाढ



**पुणे । प्रतिनिधी**

गेले दोन दिवस सतत पडणार्या पावसामुळे इंद्रायणीच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे. नदी दुथडी भरून वाहत असून, पाणी बाजूच्या शेतात पसरले आहे. नाणे- मावळाकडे जाणार्या रस्त्यावरही शेतातील पाणी पसरले आहे. त्यामुळे वाहन चालकांना वाहने चालवताना कसरत करावी लागत आहे.

या पावसामुळे शेतातील भात खाचरे तुडुंब भरली आहेत. शेती जलमय झाल्याचे दृश्य दिसून येत आहे. पावसाला जोर असल्याने इंद्रायणी नदीपात्रात मोठ्या प्रमाणात जलपर्णी वाहून येत आहे. ही जलपर्णी लोणावळा येथून वाहत वाहत कामशेत मध्ये येऊन साचली आहे. नदी पात्राचा मोठा भाग जलपर्णीने व्यापलेला दिसून येत आहे. पावसामुळे कामशेतच्या बाजारपेठेतील वर्दळही काही प्रमाणात मंदावली होती. रविवार सुट्टी असल्यामुळे लोकांनी घरी राहणे पसंत केले. पावसामुळे लोकांनी घराबाहेर पडणे टाळले होते.

# डबल डेकर बसवर शिक्कामोर्तब

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यात डबल डेकर बस धावणार आणि त्या पीएमपीएमएलच्याच असणार, यावर आता शिक्कामोर्तब झाले असून, यासंदर्भात आवश्यक कार्यवाही सुरू आहे. लवकरच पीएमपीकडून याबाबतची निविदा प्रसिद्ध करण्यात येणार आहे. त्यानंतर भाडेतत्त्वावरील इलेक्ट्रिक डबल डेकर बसची खरेदी होणार आहे. यावरून पुणेकर आणि पिंपरी-चिंचवडकरांना लवकरच याद्वारे बसप्रवास करता येणार असल्याची चिन्हे दिसत आहेत. पीएमपीच्या ताफ्यात १८८७ बस आहेत.



पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पीएमआरडीए भागातील प्रवाशांची संख्या पाहता ती अतिशय कमी आहे. त्या पार्श्वभूमीवर पीएमपी प्रशासन ताफ्यात आगामी काळात १०० इलेक्ट्रिक बस खरेदी करणार आहे. त्यातील ८० बस १२ मीटर लांबीच्या इलेक्ट्रिक बस असणार आहेत, तर यातील २० बस डबल डेकर असणार आहेत, असे दै. 'पुढारी'शी बोलताना पीएमपी अधिकाऱ्यांनी सांगितले. तत्कालीन अध्यक्ष ओमप्रकाश बकोरिया यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या पीएमपी संचालक मंडळाच्या बैठकीत 'डबल डेकर' ई-बस खरेदीच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली आहे. त्यामुळे 'डबल डेकर' खरेदीला पीएमपी प्रशासनाकडून ग्रीन सिग्नल मिळाला आहे. आता प्रशासनाने लवकरात लवकर डबल डेकर बस आणाव्यात, अशी मागणी प्रवाशांकडून केली जात आहे. ताफ्यात दोन महिन्यांत ३६ इलेक्ट्रिक बस येणार पीएमपी प्रशासनाने यापूर्वी फेम योजनेंतर्गत ६५० इलेक्ट्रिक बस खरेदी केल्या आहेत. त्यापैकी ४७३ बस पीएमपीच्या ताफ्यात यापूर्वीच आल्या आहेत. १७७ इलेक्ट्रिक बस येणे अजूनही बाकी आहे. यापैकीच जुलै महिन्यात १८ आणि पुढील जुलै महिन्यात १८ अशा एकूण ३६ इलेक्ट्रिक बस दाखल होणार आहेत, असे पीएमपी प्रशासनाने सांगितले. नवीन येणारी डबल डेकर बस इलेक्ट्रिक असणार इलेक्ट्रिकमुळे शहरातील प्रदूषण रोखण्यास मदत इंधनाची बचत होणार. भोसरी-निगडी, मनपा-बाणेर, कात्रज-हडपसर या मार्गावर धावणार बस.

# रोजगार मेळाव्यात उमेदवारांची निवड व्हावी यासाठी शिकाऊ उमेदवारी योजनेवर भर द्यावा- जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे

**पुणे । प्रतिनिधी**

जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त येत्या २७ जुलै रोजी आयोजित करण्यात येणाऱ्या रोजगार मेळाव्यात उमेदवारांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव आणि कंपन्यांना कौशल्यप्राप्त उमेदवार मिळतील यासाठी शिकाऊ उमेदवारी योजनेवर अधिक भर द्यावा, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी दिले.

छत्रपती शिवाजीनगरन येथील मॉडर्न कॉलेज ऑफ इंजिनिअरींग येथे आयोजित करण्यात येणाऱ्या रोजगार मेळाव्याच्या नियोजनाबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत डॉ. दिवसे बोलत होते. बैठकीस महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे प्रादेशिक अधिकारी पुणे सचिन बारवकर, डॉ. अर्चना पठारे, पुणे महानगरपालिकेचे उपायुक्त नितीन उदास, जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापक वृषाली सोने, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे सहायक संचालक सचिन जाधव यांच्यासह किरण साळी आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी म्हणाले, मध्यम आणि मोठ्या उद्योगांना उत्पादने पुरविणाऱ्या लघुउद्योगांना मनुष्यबळाची मोठी कमतरता असून ही चांगली संधी असल्याचे सर्व माध्यमातून उमेदवारांपर्यंत पोहोचवावे. औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधून चांगल्याप्रकारे प्रशिक्षीत झालेले मनुष्यबळ मिळावे ही उद्योगांची अपेक्षा असते. त्यास अनुसरुन उमेदवारांवर लक्ष्य केंद्रीत करावे. क्षेत्रनिहाय मागणी आणि पुरवठा याबाबत नियोजन करावे. सर्व शासकीय व खासगी आयटीआयना मेळाव्यासाठी आपल्याकडील प्रशिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना पाठविण्याबाबत कळविण्यात यावे. केंद्र शासनाची प्रधानमंत्री राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजना (एनएपीएस) अंतर्गत १ हजार ५०० रुपये दिले जातात. नुकतेच महाराष्ट्र शासनाने मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत शैक्षणिक अर्हतेप्रमाणे ६ ते १० हजार रुपये अशी भरीव रक्कम देऊन उमेदवारांना कुशल, अर्धकुशल करण्याचे ठरविले आहे. त्यामुळे इच्छुक उमेदवारांना चांगले प्रशिक्षण मिळेल, असे जिल्हाधिकारी म्हणाले. शहर व जिल्ह्यातील एमआयडीसी तसेच मराठा चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज असोसिएशनसह सर्व मोठ्या आणि लहान औद्योगिक संघटना यांनी समन्वयाने सर्व आस्थापना, लघु उत्पादक, हॉटेल व्यवसायिक, पर्यटन व्यवसाय, आदरातिथ्य व्यवसाय तसेच विविध सेवा क्षेत्रातील आस्थापना यांना मेळाव्यासाठी आमंत्रित करावे. मेळाव्याची व्यापक प्रमाणात प्रसिद्धी करावी, असेही ते म्हणाले. श्री. जाधव यांनी मेळाव्याच्या आयोजनाच्या अनुषंगाने माहिती दिली. या मेळाव्यात रोजगाराच्यादृष्टीने कंपन्या आणि उमेदवारांना बोलावण्यात येणार आहे. त्यासोबतच स्वयंरोजगाराच्यादृष्टीने सर्व विकास महामंडळे, सारथी, बार्टी, महाज्योती आदी संस्था तसेच केंद्र व राज्य शासनाच्या स्वयंरोजगार विषयक योजना राबविणारे कृषी, सहकार आदी तसेच सर्व बँका आदींना बोलावण्यात येणार आहे. उमेदवारांचे अर्ज गुगल फॉर्मवरुन भरुन घेण्यात येणार आहेत. तसेच मेळाव्याच्या ठिकाणीदेखील नोंदणीची व्यवस्था करण्यात येणार आहे. रोजगार व स्वयंरोजगाराची माहिती देण्यासाठी व्याख्याने आयोजित करण्यात येणार आहेत, असेही त्यांनी यावेळी सांगितले. बैठकीस समर्थ युवा फौंडेशनचे निलेश भटनागर यांच्यासह विविध शासकीय विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

# पूजा खेडकर प्रकरणावर रवींद्र धंगेकरांचा संताप

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यात सध्या चर्चेत आलेली वादग्रस्त आयएएस अधिकारी पूजा खेडकरने एम.बी.बी.एसचे शिक्षण पुण्यातील श्रीमती काशीबाई नवले वैद्यकीय महाविद्यालयातून पुर्ण केलं होतं. तिथे प्रवेश घेताना तिने ती पुर्णतः फीट असल्याचं तिला कोणताही आजार नसल्याचं सर्टिफिकेट सादर केलं होतं. पूजा खेडकर प्रकरणात अनेक नवनवे खुलासे समोर येत आहेत. अशातच या संपुर्ण प्रकरणावर प्रतिक्रिया देताना काँग्रेसचे नेते आणि आमदार रवींद्र धंगेकर यांनी संताप व्यक्त केला आहे.



रवींद्र धंगेकर यांनी खेडकर कुटुंबियांवर फौजदारी गुन्हा दाखल करा, त्यांची सखोल चौकशी करा, अशी मागणी केली आहे. राजकीय नेत्यांच्या मागे इडी लावण्यापेक्षा आता या अधिकाऱ्यांवर ईडी लावा. संपूर्ण खेडकर कुटुंब भ्रष्टाचारी आहे. राजकीय वरदहस्त असल्याशिवाय एवढा घोळ घालणं अशक्य आहे असं देखील रवींद्र धंगेकर यांनी म्हटलं आहे. पूजा खेडकरने परीक्षेवेळी चुकीची कागदपत्रे जमा केली. बोगस कागदपत्रे देऊन तिने प्रवेश घेतला. या संपुर्ण प्रकरणाचा सखोल तपास करण्यात यावा. तिने मोठ्या भ्रष्टाचाराने हे पद मिळवले आहे, त्याचा तपास व्हावा असंही धंगेकरांनी म्हटलं आहे.

वादग्रस्त आयएएस अधिकारी पुजा खेडकरनं पुण्यातील श्रीमती काशीबाई नवले वैद्यकीय महाविद्यालयातून एम.बी.बी.एसचे शिक्षण पुर्ण केलं होतं. तिथे प्रवेश घेताना तिने ती पुर्णतः फीट असल्याचं तिला कोणताही आजार नसल्याचं सर्टिफिकेट सादर केलं होतं. त्याचबरोबर त्यावेळी तिचे वडील दिलीप खेडकर हे क्लास वन अधिकारी असताना देखील तिने ओबीसी कोट्यातून प्रवेश घेताना नॉन क्रिमीलियर सर्टिफिकेट देखील सादर केलं असल्याचं समोर आलं आहे. त्याचबरोबर वैद्यकीय शिक्षण घेताना तिचं नाव पूजा दिलीपराव खेडकर म्हणून नोंद करण्यात आलं होतं. या सगळ्याबाबत या वैद्यकीय महाविद्यालयाचे संचालक डॉ अरविंद भोरे यांच्याशी एबीपी माझाने संवाद साधला. त्यावेळी त्यांनी याबाबतची माहिती दिली आहे. आता समोर आलेल्या या माहितीच्या आधारे पूजावरती कोणती कारवाई होणार का हे पाहणंही महत्त्वाचं ठरणार आहे.पुजा खेडकर दोषी असल्यास कारवाई करावी करण्यात यावी अशी मागणी राष्ट्रीय दृष्टीहीन संघाकडून करण्यात येत आहे. त्याचबरोबर पुजा खेडकरची सखोल चौकशी व्हावी अशी मागणी देखील राष्ट्रीय दृष्टीहीन संघाने केली आहे.